नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १ * अंक ४५ * * नाशिक * रविवार, दिनांक १३ जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

## आयआयएम वसतिगृहात बलात्कार

■ **वृत्तसंस्था, कोलकाता, दि. १२ :** इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) कोलकाता येथे शनिवारी एका विद्यार्थिनीवर बलात्कार झाल्याची घटना उघडकीस आली. आरोपीला अटक करण्यात आली आहे.

दोघांची ओळख सोशल मीडियावर झाली होती. विद्यार्थिनी काही वैयक्तिक बाबींवर सल्ला घेण्यासाठी आरोपीला भेटण्यासाठी आयआयएममध्ये आली होती. त्यानंतर तिला मुलांच्या वसतिगृहात नेण्यात आले, जिथे तिच्यावर बलात्कार करण्यात आला. बिझनेस स्कूलच्या मुलांच्या वसतिगृहात ही घटना घडली. आरोपी विद्यार्थ्याला शुक्रवारी रात्री ताब्यात घेण्यात आले आणि आज त्याला अटक करण्यात आली.

## थोडक्यात

### न्यायमूर्ती वर्मा यांना हटवण्याची तयारी सुरू



■ **नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांना हटविण्यासाठी संसदेत महाभियोग प्रस्ताव आणण्याची तयारी केंद्र सरकारने सुरू केली आहे. यासाठी लोकसभा खासदारांच्या स्वाक्षऱ्या गोळा केल्या जात आहेत.

हा प्रस्ताव लोकसभेत आणता येईल. लोकसभेत महाभियोग प्रस्ताव आणण्यासाठी किमान १०० खासदारांच्या स्वाक्षऱ्या आवश्यक असतात. तर राज्यसभेत ही संख्या ५० खासदारांची आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आधीच सांगितले आहे की, २१ जुलैपासून सुरू होणाऱ्या पावसाळी अधिवेशनात न्यायमूर्ती वर्मा यांना हटवण्याचा प्रस्ताव आणला जाईल.

### रोहित पवारांविरोधात ईडीने दाखल केले आरोपपत्र



■ **मुंबई :** आमदार रोहित पवार यांच्याविरोधात मनी लॉंड्रिंग प्रतिबंधक कायदा अंतर्गत पुरवणी आरोपपत्र मुंबईतील विशेष न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. यावर रोहित पवार यांनी आपल्या एक्स वरून एक ट्वीट करत ईडीच्या कारवाईवर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, ईडीचे अधिकारी बिचारे आदेशाचे धनी आहेत. त्यांनी फक्त आलेल्या आदेशाचे पालन केले आणि आता आरोपपत्रही दाखल केले आहे. सत्यमेव जयते,जय संविधान असे ट्विट करताना त्यांनी न्यायव्यवस्थेवर विश्वास असल्याचे म्हटले आहे.

### बांगलादेशात अर्थशास्त्रज्ञ अबुल बरकत यांना अटक



**ढाका :** शुक्रवारी भ्रष्टाचाराच्या एका प्रकरणात प्रसिद्ध बांगलादेशी अर्थशास्त्रज्ञ अबुल बरकत यांना तुरुंगात पाठवण्यात आले. ढाका ट्रिब्यूनच्या वृत्तानुसार, २० हून अधिक पोलिसांनी बरकत यांच्या घरावर छापा टाकला. त्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले.

अबुल बरकतवर त्यांच्या कार्यकाळात रेडिमेड गारमेंट कंपनी 'ॲनोनटेक्स ग्रुप' ला बेकायदेशीर मार्गाने कर्ज मिळविण्यात मदत केल्याचा आणि जनता बँकेतून २.९७ अब्ज टका (सुमारे २२५ कोटी रुपये) गबन केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात अबुल बरकतसह एकूण २३ जणांना आरोपी करण्यात आले आहे, ज्यात बांगलादेश बँकेचे माजी गव्हर्नर अतिउर रहमान यांचा समावेश आहे.

# जगभरातून पर्यटक येणार

### मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला विश्वास



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १२ :** युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिल्याच्या निर्णयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंद व्यक्त केला आहे.

युनेस्कोच्या या निर्णयामुळे शिवरायाचे १२ किल्ले जागतिक पटलावर आलेत. या निर्णयामुमळे पर्यटनाला चालना तर मिळेलच, पण सोबतच महाराजांचा गौरवशाली इतिहासही वैश्विक पातळीवर नेण्यासाठी आपल्याला फायदा होणार आहे, असे ते म्हणालेत.

मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात फडणवीस यांनी युनेस्कोने शिवरायांच्या १२ किल्ल्यांना दिलेल्या जागतिक वारसा स्थळाच्या दर्जावर समाधान व्यक्त केले.

ते म्हणाले, सर्वप्रथम जगभरातील शिवप्रेमींचे मी अभिनंदन करतो. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले हे जागतिक वारसा स्थळ म्हणजे वर्ल्ड हेरिटेज साईट घोषित करण्यासाठी नॉमिनेट केले होते. मोदींकडे देशभरातील ७ वेगवेगळ्या साईट्स गेल्या होत्या. या साईट्सना जागतिक वारसा स्थळ घोषित करण्याची शिफारस केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने पंतप्रधानांकडे केली होती. पण मोदींनी शिवरायांच्या १२ गडकिल्ल्यांना प्राधान्य दिले.

किल्ले रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी व जिंजी या १२ किल्ल्यांना आता जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळाला आहे. १२ पैकी ११ किल्ले महाराष्ट्रात आहेत, तर . जिंजी हा तामिळनाडूमध्ये आहे.

या किल्ल्यांचे वेस्टर्न घाट, समुद्र, जंगल आदी नैसर्गिक विविधतेत कसे स्थापत्य तयार करण्यात आले. त्याच्या जागा शोधण्यात आल्या. कशाप्रकारे दरवाजे तयार करण्यात आले. प्रत्येक ठिकाणी माची कशा तयार करण्यात आल्या. अशा सर्वच गोष्टी आपण युनेस्कोपुढे ठेवल्या. त्यानंतर युनेस्कोच्या शिष्टमंडळाने भारतात येऊन सर्वच किल्ल्यांना भेट दिली.

आपले एक शिष्टमंडळ युनेस्कोत पाठवले. त्यांनी तिथे टेक्निकल प्रझेंटेशन केले. त्यानंतर मतदानाचा अधिकार असणारे सर्वच देशांच्या राजदुतांशी आम्ही चर्चा केली. मी व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी पंतप्रधानांची भेट घेतली. त्यानंतर त्या त्या देशातील राजदुतांना त्या त्या देशातील सरकारांशी संपर्क साधण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानंतर काल वीसही देशांनी आपल्या बाजूने मतदान केले आणि शिवरायांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित झाले. त्यामुळे शिवप्रेमींचा हा एक मोठा विजय आहे.

या निर्णयामुळे पर्यटनाला चालना मिळेल, महाराजांचा गौरवशाली इतिहास वैश्विक करण्यासाठी व वैश्विक पर्यटक आकृष्ट करण्यासाठी फायदा होईल, असे ते म्हणाले.

#### शिवरायांचा इतिहास वैश्विक पातळीवर

फडणवीस पुढे म्हणाले, मतदान करणाऱ्या सर्वच देशांनी शिवरायांनी बांधलेल्या या किल्ल्यांचे कौतुक केले. अनेक लोक हे किल्ले बांधताना किती पुढचा विचार करण्यात आला होता हे पाहून आश्चर्यचकितही झाले होते. आता हे किल्ले जागतिक वारसा स्थळ झाल्यामुळे आपले महाराजांचे किल्ले वर्ल्ड मॅपवर आलेत. युनेस्कोच्या सगळ्या वेबसाईट्सवर या किल्ल्यांची सर्वच ऐतिहासिक माहिती उपलब्ध होईल. वर्ल्ड टूरिझम मॅपवर हे किल्ले येणार आहेत. युनेस्कोच्या माध्यमातूनही त्या किल्ल्यांच्या ठिकाणी जागतिक वारसा स्थळ म्हणून सगळी माहिती असणाऱ्या कियॉस्क उभे राहणार आहे.

# तरुणांचे कौशल्य हे भविष्यातील सर्वात मोठे भांडवल

### रोजगार मेळावा : ५१ हजार रोजगार पत्रांचे वाटप



■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. १२ :** पंतप्रधान मोदी यांनी शनिवारी १६ व्या रोजगार मेळाव्यात ५१ हजारांहून अधिक तरुणांना नोकरी पत्रे वाटली.

त्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सांगितले की, तरुणांची क्षमता ही आपल्या भारताच्या भविष्याचे सर्वात मोठे भांडवल आणि हमी आहे. आमचे सरकार या भांडवलाला समृद्धीचे स्त्रोत बनवण्यात गुंतलेले आहे.

ते म्हणाले की, मी दोन दिवसांपूर्वीच ५ देशांच्या दौऱ्यावरून परतलो आहे. भारताच्या युवाशक्तीचा आवाज प्रत्येक देशात ऐकू येत होता. या काळात जे काही करार झाले आहेत, त्यांचा फायदा युवकांना नक्कीच होईल. तुमचे विभाग वेगळे आहेत पण ध्येय एकच आहे. काम काहीही असो, पद कोणतेही असो, क्षेत्र कोणतेही असो, ध्येय राष्ट्रीय सेवा आहे. एकमेव ध्येय म्हणजे नागरी सेवा.

देशभरात ४७ ठिकाणी रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले होते. आतापर्यंत ९.७३ लाखांहून अधिक लोकांना रोजगार मिळाला आहे. आज आपला देश जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वेगाने प्रगती करत आहे. हा आपल्या देशातील तरुणांचा पराक्रम आहे, असेही पीएम मोदी यावेळी म्हणाले.

### अहमदाबाद विमान अपघाताचा प्राथमिक अहवाल जाहीर

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :** एअर इंडियाच्या फ्लाइट एआय-१७१ चा प्राथमिक तपास अहवाल आला आहे. विमान अपघात तपास ब्युरोने १२ जुलै रोजी १५ पानांचा अहवाल सार्वजनिक केला.

सुरुवातीच्या निकालांवरून असे दिसून आले आहे की, जेटच्या दोन्ही इंजिनमधील इंधन प्रवाह नियंत्रित करणारे स्विच निकामी झाले होते, ज्यामुळे टेकऑफनंतर काही वेळातच इंजिन बंद पडले आणि विमानाचा जोर कमी झाला. पायलटने ते पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो अयशस्वी झाला. अहवालात असेही उघड झाले आहे की उड्डाणापूर्वी, एका फ्लाइट सेन्सरमध्ये समस्या होती, जी दुरुस्त करण्यात आली होती.

# जयंत पाटील यांच्या राजीनाम्यावरून संभ्रम



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १२ :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शनिवारी अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिल्याचे वृत्त अनेक समाज माध्यमांवर झळकले आहे.

त्यांच्या जागी पक्षाने शशिकांत शिंदे यांची नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड केली आहे. ते येत्या १५ जुलै रोजी जयंत पाटील यांच्याकडून पदभार स्वीकारतील अशी माहिती आहे.

दुसरीकडे, याच पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी जयंत पाटील यांच्या राजीनाम्याचे वृत्त फेटाळून लावले आहे. तर आमदार रोहित पवार यांनी पक्षात बदलाला सुरूवात झाल्याचे म्हटले आहे. यामुळे जयंत पाटील यांच्या राजीनाम्याविषयी संभ्रम निर्माण झाला आहे.

#### जयंत पाटील हेच प्रदेशाध्यक्ष

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याचे वृत्त पूर्णतः खोडसाळपणाचे असल्याचा दावा आमदार तथा मुख्य प्रवक्ते जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. जयंत पाटील हे प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यांच्या राजीनाम्याच्या बातम्या प्रसारीत होणे, हा निव्वळ खोडसाळपणा आहे, पक्ष एका नियमानुसार आणि शिस्तीनुसारच चालत असतो, असे आव्हाड यांनी म्हटले आहे.

#### जयंत पाटील भाजपमध्ये जाणार नाहीत

राजीनामा दिला म्हणून जयंत पाटील भाजपमध्ये जातील असे नाही, कारण आतापर्यंत ते साहेबांसोबत राहिले आहेत. सत्तेसाठी ते जाणार नाहीत, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी दिली. वरिष्ठ नेत्यांनी ठरवले आहे, आता बदल व्हायला पाहिजे त्याची सुरुवात झाली आहे, असेही रोहित पवार यांनी म्हटले आहे.

# गुणवत्तेला प्रोत्साहन देणारी ठरेल ॲग्रोव्हिजनची नूतन वास्तू!




केंद्रीय मंत्री गडकरी यांनी व्यक्त केला विश्वास : ॲग्रोव्हिजन फार्मर्स मार्केटचे भूमिपूजन

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १२ :** शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी, आधुनिक कृषी तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी आणि शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी १७ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या ॲग्रोव्हिजनला शेतकऱ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे. विदर्भातील शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञान अवगत व्हावे, त्यांना प्रशिक्षण मिळावे आणि जागतिक दर्जाच्या कृषी विषयक चर्चा घडवून याव्यात यासाठी निर्माण होणारी ॲग्रोव्हिजनची भव्य वास्तू म्हणजे समाजातील गुणवत्तेला प्रोत्साहन आणि कृषी ज्ञान संकुल असणार आहे असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज येथे केले.

वर्धा मार्गावर हॉटेल रेडिसनच्या शेजारी ॲग्रोव्हिजन फार्मर्स मार्केटचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ॲग्रोव्हिजन फाउंडेशनचे अध्यक्ष रवींद्र बोरटकर, मार्गदर्शन व ज्येष्ठ कृषीतज्ज्ञ डॉ. सी. डी. मायी, खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, ॲडव्हान्टेज विदर्भचे सचिव डॉ. विजय शर्मा, ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे राजू मिश्रा, बाळासाहेब कुळकर्णी, स्व. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेचे सचिव प्रशांत बोपर्डीकर, माजी खासदार डॉ. विकास महात्मे प्रामुख्याने उपस्थित होते.

गडकरी म्हणाले, भविष्यातील हे फार्मर्स मार्केट आणि कम्युनिटी सेंटर फक्त एक इमारत नाही, तर विदर्भाच्या शाश्वत विकासाच्या दृष्टीने उभारलेली भविष्याची पायाभरणी आहे. ही इमारत केवळ भौतिक वास्तू न राहता, शेती, संशोधन, संस्कृती आणि समाजासाठी एक प्रेरणास्थान ठरेल.

#### सर्व कार्यालये एकत्र

खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती, असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट, स्व. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्था, ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान, खासदार क्रीडा महोत्सव समिती, आदी संस्थांचे कार्यालय या एकाच इमारतीत राहणार आहेत. ही इमारत नागपूर विभागात एक नवा मानदंड ठरवेल असेही ते म्हणाले.





# आमदार निवासातील धिंगाणा

स्टेटलाईन
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी मुंबईतील आकाशवाणी आमदार निवासस्थानातील उपहारगृहाच्या कर्मचाऱ्याला केलेल्या मारहाणीच्या घटनेवरून सर्वसामान्य माणूसही चक्रावून गेलाय. अरेरे काय हे? असे हे झालेच कसे?

मुंबईत राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन चालू असताना सत्ताधारी पक्षाचा आमदार आपल्याला नित्कृष्ठ दर्जाचे जेवण मिळाले म्हणून कमालीचा संतप्त होतो व कमरेला टॉवेल व अंगात बनियन अशा वस्त्रानिशी उपहारगृहात जाऊन तेथील कर्मचाऱ्याला ठोसे लगावतो, याचे व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल झाले.

त्या आमदार महोदयांना मिडियातून वारेमाप प्रसिध्दी मिळाली म्हणून ते कदाचित खूश झाले असतील पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्या आमदाराचे कान उपटले आहेत. अशा बेजबाबदार वर्तनाने आमदारांची प्रतिष्ठा कलंकित होते असे त्यांनी म्हटले आहे. एवढेच नव्हे तर आमदार संजय गायकवाड हे ज्या शिवसेना पक्षाचे आहेत, त्या पक्षाचे प्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही त्या आमदारांच्या गैरकृत्याचे समर्थन करता येणार नाही असे म्हटले आहे.

सर्व मिडियातून आमदार निवासातील उपहारगृहात झालेल्या मारहाणीच्या घटनेची छी थू झाली आहे. यात सत्ताधारी पक्षाच्या म्हणजेच महायुतीच्या प्रतिमेला काळीमा फासला गेला आहेच पण त्या आमदारावर तत्काळ कोणातीच कारवाई न झाल्याने सरकार त्याला का संरक्षण देते आहे, असा प्रश्न सर्वांना पडला आहे.

जेवण खराब मिळाले किंवा उपहारगहात वारंवार खराब जेवण मिळते म्हणून आमदाराने तेथील कर्मचाऱ्याला मारहाण करणे योग्य आहे का? आमदार म्हणजे विधिमंडळाचा सदस्य असतो. मतदारांनी त्याला निवडून दिले आहे. ज्या विधिमंडळाला कायदे करण्याचा अधिकार आहे, त्या सभागृहचे सदस्य स्वतःच कायदा हाती घेत असतील तर त्यांच्यावर तत्काळ गुन्हा का दाखल झाला नाही?

आपण कायदे मंडळाचे सदस्य आहोत, याचे भान आमदार संजय गायकवाड यांना नसावे का? आमदार म्हणून सदस्याला विशेषाधिकार मिळतात. त्याचा कुठेही अवमान झाला किंवा त्याला कमी महत्व दिले गेले तरी ज्याने कोणी अवमान केला किंवा ज्याने कोणी त्यांची बदनामी केली त्याच्या विरोधात विशेष हक्कभंग आणला जातो, त्याची विधिमंडळाच्या विशेष हक्क समितीकडून चौकशी होते व त्या समितीला शिक्षा देण्याचा सुध्दा अधिकार कायद्याने दिला आहे.

ज्याला आमदार म्हणून विशेषाधिकार आहेत, तोच जर कायदा हातात घेऊन रागाच्या भरात कोणाला मारहाण करीत असेल तर त्याच्यावर काय कारवाई करावी हे आता विधानसभा अध्यक्ष व विधान परिषदेच्या सभापतींनी ठरवायचे आहे.

आमदाराने आमदार निवासातील उपहारगृहातील कर्मचाऱ्याला केलेल्या मारहाणीच्या घटनेनंतर सरकारची काहीच जबाबदारी नाही काय? सरकार व सत्ताधारी पक्ष म्हणून त्या आमदारावर तत्काळ कोणतीच कारवाई का होऊ नये? मारहाणीच्या घटनेनंतर अन्न व औषध प्रशासनाला जाग आल हेही नसे थोडके.

या विभागाच्या अधिकाऱ्यांनी डाळ, भात व इतर अन्नाचे नमुने घेऊन तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले आहेत. आमदार निवासातील उपहारगृहात रोज शेकडो लोक जेवणखाण करतात. तिथले दर कमी किवा वाजवी असतात. एकशे चाळीस रूपयात राइस प्लेट मिळते. त्यात दोन चपात्या, डाळ, भात, दोन भाज्या, दही, पापड तसेच स्वीट डिश म्हणून खीरही मिळते. तसेच नाष्टा म्हणून मिळणारे पदार्थही वाजवी दरात असतात.

आमदार निवासातील उपहारगृहात परवडणाऱ्या दरात नाष्टा व जेवणखाण मिळते म्हणून मंत्रालय व आजुबाजुच्या सरकारी व खाजगी कार्यालयातील नोकरदार व कामासाठी येणारे लोक तिथेच जेवण करतात. विशेष म्हणजे उपहागृहाचे व्यवस्थापन गेली तीन दशके एकाच कंत्राटदाराकडे आहे. व्यवस्थापकही वर्षानुवर्षे तोच आहे.

या काळात राज्य सरकारच्या अन्न व औषध प्रशासनाने किती वेळा धाडी टाकल्या, किती वेळा तेथील अन्न पदार्थांची तपासणी केली. आपण चार वेळा तरी निकृष्ठ अन्नाविषयी तक्रार केल्याचे मारहाण करणारे आमदार सांगत आहेत.

त्याची माहिती विधिमंडळाच्या उपहारगृह समितीकडे किंवा अन्न व औषध प्रशासनाकडे पोचली नाही का? कोणत्याही सार्वजनिक कामांची कंत्राटे कशी दिली जातात, याची नेहमीच उघडपणे चर्चा होते मग तीन दशके एकच कंत्राटदार राज्यात कोणाचेही सरकार असले तरी त्यांना सोयीचा ठरतो हेच त्या मागचे गुपित आहे का?

जेव्हा जेवण नित्कृष्ठ म्हणून आमदार उहारगृहाच्या कर्मचाऱ्याला मारहाण करतात मग रस्ते निकृष्ठ बनवले जातात, नवीन उड्डाण पुलांना तडे जातात किंवा खड्डे पडतात, पाणी पुरवठा अपुरा किंवा अस्वच्छ असतो, तेव्हा सर्वसामान्य जनतेने काय करावे? खते किंवा बियाणे शेतकऱ्यांना निकृष्ठ दिली जातात तेव्हा त्यांनी कुठे धावत जायचे?

आश्रम शाळांतील मुलांना किंवा अंगणवाडीत आहार जेव्हा नित्कृष्ठ दिला जातो तेव्हा त्या बालकांनी कुठे आक्रोश करायचा ? आज सरकारी शाळांतून मुलांना नित्कृष्ठ शिक्षण दिले जाते, शिक्षणाचा दर्जा घसरलाय अशी रोज ओरड ऐकायला मिळते मग पालकांनी कुणाकडे कसा संताप प्रकट करायचा ?

संजय गायकवाड हे दोन वेळा बुलढाण्यातून आमदार म्हणून निवडून आलेत. ते कपाळावर गंध लावतात, त्यांच्या गळ्यात रूद्राक्षाच्या माळाही असतात, स्वतःला कट्टर हिंदू धार्मिक समजणारे असे का वागतात? निकृष्ठ जेवण मिळाले म्हणून त्यांचा तोल ढळलाच कसा?

उपहारगृहाच्या कर्मचाऱ्याला मारहाण केली, त्याबद्दल आमदार महोदयांना पश्चाताप नाही किंवा आपली चूक झाली असे वाटत नाही. हेच संजय गायकवाड यापुर्वी अनेकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत एका मुलाखतीत भारतातील आरक्षण पध्दतीवर भाष्य केले तेव्हा याच आमदारांनी राहुल गांधी याची जिभ छाटणाऱ्यास ११ लाखाचे इनाम जाहीर केले होते.

काही वर्षापुर्वी जंगलात आपण वाघ मारला असून त्याचा दात आपल्या गळ्यातील माळेत असल्याचा दावा केला होता, त्यावर वन विभागाने त्यांच्यावर गुन्हा नोंदवला होता. त्यांची मोटार एक पोलीस धूत असल्याचा व्हिडिओ मध्यंतरी व्हायरल झाला होता. महाराष्ट्रातील पोलिसांची बदनामी होईल असेही त्यांनी एकदा आक्षेपार्ह भाष्य केले होते.

लोकांनी निवडून दिले म्हणून मुजोरपणाने वागणे किंवा कायदा हातात घेऊन मारहाण करणे इथपर्यंत यांची मजल कशी जाते? आपल्या नेत्यांना काय वाटेल, याचे त्यांना भय राहिले नाही का? पक्ष नेतृत्वाचा आमदारांना धाक राहिलेला नाही का?.

विधिमंडळातील संख्या बळाच्या स्पर्धेत पक्ष नेतेही आमदारांच्या बेताल वर्तनावर नियंत्रण ठेऊ शकत नाहीत हेच चित्र आमदार निवासातील घटनेनंतर महाराष्ट्राला दिसले. विधानसभेत अध्यक्षांच्या समोरील राजदंड पळवला किंवा त्याला हात लावला तरी शिक्षा होते, गोंधळ घालून सतत कामकाज बंद पाडले तरी निलंबन होते, मग आमदार निवासात असभ्य व असंस्कृत वर्तन करणाऱ्या आमदारावर तत्काळ कारवाई का झाली नाही? अध्यक्ष व सभापती यांच्यावर कारवाईचा निर्णय ढकलून सरकारने काय साधले? पहिलीपासून हिंदी सक्तिच्या निर्णयानंतर सत्तापक्षाच्या आमदाराच्या धिंगाण्याने सरकारच्या प्रतिमेला आणखी एक धक्का बसला आहे.

# परिस्थितीला दोष देण्यापेक्षा हिंमतीने मात करा

आजकाल प्रतिकूल परिस्थितीवर मात करून हिंमतीने जीवन जगण्यापेक्षा व यशाला काबीज करण्यापेक्षा परिस्थितीला दोष देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सध्या समाजात खूप वाढली आहे. उच्च शिक्षण घेण्यासाठी किंवा चांगल्या कॉलेजला प्रवेश घेण्यासाठी बहुतांश विद्यार्थी आपली आर्थिक परिस्थिती तेवढी सक्षम नाही म्हणून परिस्थितीला दोष देत अर्ध्यावर शिक्षण सोडून घरी बसले आहेत.

आहे त्या परिस्थितीवर मात करून उच्च शिक्षणाचा पर्वत लीलया सर करायचा सोडून, परिस्थितीला दोष देणे हा आपला वैयक्तिक कमीपणा ठरू शकतो. आपल्यात त्या परिस्थितीचा सामना करण्याची हिंमत व धाडस नाही, असेच म्हणावे लागेल.

अशा मुलांना जर एखाद्याने विचारले, बाबा तू अर्ध्यावर शिक्षण सोडून घरी का बसलास? तुला पुढील उच्च शिक्षण शिकू वाटत नाही का? तेव्हा ती मुले म्हणतात की, अहो काका माझी उच्च शिक्षण शिकायची व मोठ्या पदावर रुजू व्हायची खूप इच्छा आहे, पण माझी आर्थिक परिस्थिती हालाखीची व कमकुवत असल्यामुळे मी पुढील उच्च शिक्षण घेऊ शकत नाही.

माझे आईवडील गरीब आहेत. शेतात काबाडकष्ट करून कसाबसा घर प्रपंच चालवतात. आणि माज्या शिक्षणाला पैसा पुरवतात. मला उच्च शिक्षण शिकवण्यासाठी ते आता कुठवर पैसा पुरवतील? आणि मी तरी कुठवर त्यांच्या जीवावर शिक्षण शिकू? असे बोलून ते मोकळे होतात.

असे बोलणे त्या मुलाचे कदाचित खरे आहे. पण परिस्थितीला दोष देणे त्या मुलाचे अनुचित आहे. शिक्षण शिकण्यासाठी माणसाला परिस्थिती कधीच आड येत नाही. माणूसच परिस्थितीला घाबरून माघार घेतो आणि परिस्थितीला दोष देत बसतो.

बहुतांश विद्यार्थी म्हणतात की, आई-वडिलांची परिस्थिती मला शिकवण्या एवढी सक्षम नाही, म्हणून मी शिक्षण शिकायचे थांबवले आहे. पण विद्यार्थ्यांच्या मनात असे का येत नाही की, आपण काम करत करत शिकून यश मिळवले पाहिजे.

कष्ट करून स्वतःच्या जीवावर शिक्षण घेऊन यश मिळवणारे व मोठ्या पदावर रुजू होणारे या जगात खूप लोक आहेत. त्यांनी परिस्थितीला कधीच दोषी ठरवले नाही. त्यांच्यात काम करून शिकण्याची धमक होती. म्हणून ते यशस्वी झाले. तुमच्यात काम करून शिकायची धमक नाही म्हणून तुम्ही परिस्थितीला दोषी ठरवत आहात.

श्रीमंत घरातील मुले कधीच यशस्वी होऊन मोठ्या पदावर रुजू होत नाहीत. ज्यांना आई-वडिलांच्या कष्टाची व गरिबीची जाणीव आहे, आई-वडिलांचा जीवन संघर्ष ज्ञात आहे, तीच मुले प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशाचे उंच शिखर गाठतात. स्वतःच स्वतःच्या जीवनाला घडवतात. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शिकणारी गरीब घरातील होतकरू मुलेच कोणत्याही परीक्षेत श्रीमंत मुलांच्या पुढे असतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर अतिशय गरीब घरातून मोठ्या उंचीवर पोहोचलेलं एक जबरदस्त व्यक्तिमत्व तरुणांसाठी प्रेरणास्थान व आदर्श आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर परिस्थितीला दोष देत बसले असते, तर कधीच आधुनिक भारताचे राष्ट्र निर्माते व भारतीय घटनेचे प्रमुख शिल्पकार झालेच नसते.

डॉ.बाबासाहेबांएवढी बिकट परिस्थिती हल्ली आमच्या कोणत्याच युवकाची नाही, बाबासाहेबांना शिक्षण शिकत असताना किती आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागले? जातीयतेचे किती विखारी चटके सहन करावे लागले? बाबासाहेबांमुळेच आज आपल्याला यशाचा मार्ग सोपा व सुखकर झाला आहे. तरीपण आजकालची मुले परिस्थितीला दोष देऊन शिक्षणाला रामराम ठोकत आहेत.

मेंढपाळ कुटुंबातील बिरदेव डोने हा मुलगा प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आयपीएस अधिकारी झाला आहे. तो युवकांसाठी आदर्श व दीपस्तंभ ठरला आहे. त्याची प्रेरणा आमच्या युवकांनी घेऊन प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यशाला काबीज केले पाहिजे.

आपल्या देशात असे कितीतरी महात्मे होऊन गेले आहेत, की त्यांनी परिस्थितीला दोष न देता, प्रतिकूल परिस्थितीवर हिंमतीने मात करून यशाला गवसणी घातली आहे. या महापुरुषांचा जीवन संघर्ष व त्यांचा जीवन प्रवास आपण पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञात करावा आणि परिस्थितीला न दोष देता, तिच्यापुढे न डगमगता हिंमतीने तिचा सामना करावा...आणि यशाला आपल्याकडे खेचून घ्यावे.

कारण परिस्थितीच आपल्याला घडवत असते...परिस्थितीची जाणीव ठेवून आपण खूप खूप अभ्यास केला पाहिजे... आई-वडिलांवर तेवढे अवलंबून न राहता स्वतःच्या जीवावर कष्ट करून शिकले पाहिजे... कारण जो मनुष्य स्वतःच्या हिमतीवर, कष्ट करून शिकतो आणि परिस्थितीला झुकवून मोठ्या उंचीवर पोहोचतो, त्याची इतिहास सुद्धा नोंद घेतो...हे लक्षात असू द्या...

----------------

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी. ता. अहमदपूर जि. लातूर**
**मो.7498715661**

■ ■ ■

# ऐश्वर्या रॉय (बच्चन) या अभिनेत्रीच्या केसमध्ये कोर्टाने काय महत्वपूर्ण निकाल दिला?

सोप्या भाषेत
इन्कमटॅक्स
आणि इन्वेस्टमेन्ट

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.




नेहमीच्या स्वरुपात आपण सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रुपात सोन्याबद्दलची नवीन माहिती बघणार आहोत.

**प्रश्न** – दरवर्षी सोन्याच्या किंमतीत वाढ होत राहते, तर या वाढीव किंमतीवर इन्कमटॅक्स लागतो का?

■ या प्रश्नाच्या उत्तरासाठी आपल्याला प्रसिद्ध अभिनेत्री ऐश्वर्या रॉय केसमध्ये जावे लागेल. ऐश्वर्या के. रॉय विरुद्ध डेप्युटी कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स (2007) 104 ITD 166 (मुंबई ट्रिब्यु) या प्रसिद्ध केसमध्ये जेव्हा इन्कमटॅक्सवाल्यांनी धाड टाकली तेव्हा ऐश्वर्या रॉयकडे हिऱ्यांचे दाग-दागिने सापडले, त्यावेळेस इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांनी त्याची किंमत काढून इन्कमटॅक्स लावला.

कारण तिच्याकडे हिऱ्याचे पदक (लटकन), चैन आणि हिऱ्याचे सोन्यात गाठलेले टॉप सापडले. ते सर्व इन्कमटॅक्समध्ये दाखवलेले होते. तरी इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांनी वाढलेल्या भावावर फरक काढून इन्कमटॅक्स लावले, तथा ऐश्वर्या रॉय यांना टॅक्स भरण्यास सांगितले.

इन्कमटॅक्स अधिकाऱ्याने खरेदी किंमत न जुमानता वाढीव किमतीवर इन्कमटॅक्स भरण्यास सांगितले. ही अभिनेत्रीने वर अपील केले आणि तिच्या बाजूने कोर्टाचा निकाल लागून त्यांना वाढीव भावातील टॅक्स भरण्यास सूट देण्यात आली. येथे इन्कमटॅक्स विभाग हारला.

सोप्याभाषेत असे म्हणता येईल की खरेदी किंमतच इन्कमटॅक्समध्ये धरली जाईल. वाढीव किमतीवर इन्कमटॅक्स लावला जाणार नाही.

**प्रश्न** – ऐश्वर्या के. रॉय या केसमध्ये मुंबई हायकोर्टाने काय निकाल दिला?

■ या साठी आपल्याला थोडी केसची माहिती घेणे क्रमप्राप्त आहे. सर्चच्या वेळेस धाडीमध्ये ऐश्वर्या रॉयकडे 42,02,978/- रुपयांची त्यावेळी ज्वेलरी सापडली. ऐश्वर्यांना ही ज्वेलरी कशी व कुठून आणली याचे सविस्तर उत्तर मागितले. त्यांनी त्याचे उत्तरही दिले.

परंतु, इन्कमटॅक्सवाल्यांना ते मान्य झाले नाही व त्यांनी 19,89,628 इतक्या रकमेच्या दागिन्यावर इन्कमटॅक्स लावले. रीतसर ही केस बॉम्बे हायकोर्टात गेली. तेथे कोर्टाने कमिशनर ऑफ इन्कमटॅक्सचे म्हणणे मान्य केले नाही व ऐश्वर्या रॉय यांच्या बाजूने निर्णय दिला. तथा अधिकाचा लावलेला टॅक्स रद्द केला.

पुढील लेखामध्ये आपण आणखी अशीच सोन्याबद्दलची नवीन माहिती जाणून घेणार आहोत. त्यात त्यांना अरेस्ट करण्याचे अधिकार आहेत का?.

ज्या वाचकांना काही प्रश्न किंवा सुचना असतील त्यांनी 9422218428 या वर फक्त व्हॉटस्अॅप करावे, यांची उत्तरे याच पेपर च्या पुढील लेखमालेत निःशुल्क देण्यात येतील, ही नम्र सुचना.

■ ■ ■

# ऑनलाइन जुगारच्या विळख्यात युवापिढी



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे आणि या तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल ही जीवनावश्यक गरज बनली आहे. आजची तरुण पिढी मोबाईलच्या इतकी आहारी गेली आहे की या तरुणांना मोबाईलचे व्यसनच जडले आहे.

आज प्रत्येक तरुणाकडे स्मार्टफोन आहे. या स्मार्टफोनमध्ये इंटरनेटवर चालणारे अनेक प्रकारचे गेम असतात. या गेमने तरुणांना अक्षरशः वेड लावले आहे. कॅण्डी क्रश, ब्ल्यू व्हेल, अँग्री बर्ड, पोकोमेन, पब्जी असे ऑनलाइन गेम इंटरनेटवर धुमाकूळ घालत आहेत.

ऑनलाइन रमी गेम हा देखील त्यापैकीच एक गेम. या ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात तरुणाई अडकली आहे. ऑनलाइन रमी गेम खेळण्याचे वेड तरुण पिढीला आर्थिक नुकसान करणारे ठरत आहे. मोबाईलवर खेळला जाणारा हा गेम म्हणजे एकप्रकारचा जुगाराच आहे. हातात असलेल्या मोबाईलवर ऑनलाइन रमी खेळण्याचे अनेक एप्लिकेशन उपलब्ध आहेत. घरी, शेतात, नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी अनेकजण एकत्र येऊन ऑनलाइन रमी खेळताना दिसत आहे.

ऑनलाइन रमी हा एकप्रकारचा जुगार असून या जुगारात तरुण पिढी पुरती अडकली असून त्यांना त्यातून बाहेर काढण्याऐवजी चित्रपट तारे आणि क्रिकेट खेळणारे खेळाडू या ऑनलाइन रमी गेमची टीव्हीवर जाहिरात करून तरुण पिढीला जुगारच्या गर्तेत ढकलत आहे. चित्रपट तारे असोत की क्रिकेटपटू हे तरुणांचे आयडॉल असतात. त्यांच्या सर्व गोष्टींचे तरुण मुले अनुकरण करत असतात म्हणूनच ऑनलाइन रमी चालवणाऱ्या कंपन्या या सिलिब्रेटींना करोडो रुपये देऊन आपली जाहिरात करायला लावतात मात्र या सिलिब्रेटींनी आपण पैशासाठी तरुण पिढीला कोणत्या मार्गावर नेत आहोत याचा विचार करावा.

केवळ पैसे कमावणे हा सिलिब्रेटींचा उद्देश नसावा सामाजिक दायित्व देखील तितकेच महत्वाचे आहे. चित्रपट तारे आणि क्रिकेटर यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून ऑनलाइन रमीच्या जाहिराती बंद कराव्यात. ऑनलाइन जुगारच्या विळख्यात अडकल्याने तरुणांना मोठ्या आर्थिक नुकसानिस सामोरे जावे लागत आहे.

ऑनलाइन रमी गेमच्या नादाला लागून अनेकजण कंगाल झाले आहेत. ऑनलाइन रमी गेममुळे अनेक कुटुंबे उध्वस्त होत आहेत. ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात अडकल्याने अनेक कुटुंबे बेघर झाले आहेत. ऑनलाइन रमी खेळून अनेक तरुण कर्जबाजारी झाली आहेत.

ही कर्जे फेडण्यासाठी पालकांनी आपली घरे व शेती विकली आहे. सहज पैसे कमवण्याचे आमिष दाखवून लोकांच्या घामाची कमाई लुटली जात आहे. ऑनलाइन रमी खेळताना पैसे हरल्याने तरुणांमध्ये नैराश्य येत आहे. यातून काही तरुणांनी आत्महत्या देखील केल्या आहेत.

या गेममुळे हिंसाचार देखील वाढला आहे. दक्षिणेकडच्या राज्यांनी ऑनलाइन गेमवर बंदी घातली आहे. कर्नाटक सरकारने तसा कायदाच केला आहे. केरळ, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यातही ऑनलाइन रमीवर बंदी आहे. पुरोगामी महाराष्ट्रात मात्र अजूनही ऑनलाइन रमीवर बंदी नाही. गेल्या वर्षी झालेल्या पावसाळी अधिवेशनात देखील हा प्रश्न चर्चेत आला होता मात्र न्यायालयाने ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले.

न्यायालयाने जरी ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिला असला तरी महाराष्ट्र सरकारने अध्यादेश काढून तसा कायदा करावा. सरकारकडे प्रचंड बहुमत आहे शिवाय विरोधी पक्ष देखील या अध्यादेशाला पाठिंबाच देतील त्यामुळे अध्यादेश काढून ऑनलाइन रमीवर बंदी घालण्याचा कायदा महाराष्ट्र सरकारला करता येऊ शकतो. राज्यातील तरुणांना ऑनलाइन रमी या जुगारातून वाचवायचे असेल आणि तरुणांना ऑनलाइन जुगाराच्या विळख्यातून सोडवायचे असेल तर महाराष्ट्र सरकारने ऑनलाइन रमीवर बंदी घालणारा कायदा करायलाच हवा.

■ ■ ■

## लाडकी बहीन योजनेवर टीका म्हणजे उलटा चोर कोतवाल को डांटे..

वाचक लिहितात

राज्यातील लाडकी बहीन योजना सुरु झाल्यापासून विरोधकांकडून सातत्याने टीका सुरू आहे. मात्र सरकारच्या या उपक्रमाला मिळणारा जनसमर्थन पाहता विरोधकांची ही भूमिका म्हणजे उल्टा चोर कोतवाल को डांटे अशी म्हण आठवते, असे मत आनंदबाबू कदम यांनी व्यक्त केले आहे.

महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महायुती सरकारने राबवलेली लाडकी बहीन योजना आणि इतर कल्याणकारी योजनांना विरोधकांकडून हेतुपुरस्सर प्रश्नचिन्ह लावले जात आहे.

खात्यांमध्ये पैसे जमा होण्यास सुरुवात होताच, विरोधकांनी योजना बंद होणार, पैसे कुठून येणार? इतर योजनांचे पैसे वापरले जातात, असे आरोप करू लागले आहेत. कदम पुढे म्हणाले की, ज्यांचे ९० टक्के खासदार व आमदार कोट्यधीश आहेत, ते स्वतः मात्र सरकारकडून भरघोस वेतन, भत्ते, निवास सुविधा, वाहन, हवाई प्रवास, टेलिफोन व इतर अनेक सुविधांचा लाभ घेतात. इतकेच नव्हे, तर कार्यकाळानंतर पेंशनही घेतात.

हेच लोक जर सरकारकडून मिळणाऱ्या सर्व लाभांचा त्याग करतील, तर लाडकी बहीन योजनेसाठी भरपूर निधी उपलब्ध होऊ शकतो, असे त्यांचे स्पष्ट मत आहे.

त्यांनी पुढे स्पष्ट केले की, ही योजना गरीब, होतकरू महिलांसाठी संजीवनी ठरत असून, समाजात सकारात्मक बदल घडवत आहे. त्यामुळे अशा योजनांना राजकीय रंग देणे दुर्दैवी आहे.

**■ आनंदबाबू कदम**
**दत्तवाडी, नागपूर ९८६०२०८७३७**



## तुम्ही देखील फ्रीजमधून बाहेर काढलेले अन्न खात असाल तर... सावधान

आपण रात्री उरलेलं अन्न हे खराब होऊ नये म्हणून ते फ्रिजमध्ये ठेवतो. प्रत्येक घरात असचं चित्र पाहायला मिळतं. फ्रीजमध्ये अन्न ठेवून ते पुन्हा खाणे हे खूप सामान्य आहे. बऱ्याच घरांमध्ये, जर जास्त अन्न शिल्लक राहिले तर ते फ्रीजमध्ये ठेवले जाते.

कधी कधी वेळेअभावी लोक दिवसभराचे अन्न एकदा शिजवतात आणि ते फ्रीजमध्ये ठेवतात आणि नंतर ते हळूहळू खातात. फ्रीजमध्ये ठेवलेले अन्न खाण्याचे कारण काहीही असो. मात्र त्याबाबत काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक असते. अन्यथा आजारी पडण्यास वेळ येईल.

उन्हाळ्याप्रमाणेच पावसाळ्यातही अन्नाची जास्त काळजी घ्यावी लागते. म्हणून जर तुम्ही फ्रीजमध्ये ठेवलेले अन्न खाल्ले तर या छोट्या चुका अजिबात करू नका. नाहीतर त्याचा परिणाम शरीरावर देखील होण्यास सुरुवात होईल.

**फ्रिजमध्ये अन्न ठेवताना कोणती काळजी घ्यावी?**

अन्न थंड झाल्यावरच फ्रीजमध्ये ठेवा. गरम अन्न कधीही फ्रिजमध्ये ठेवू नये. जेव्हा गरम अन्न फ्रिजच्या थंड तापमानात ठेवले जाते तेव्हा दोन्हीच्या तापमानात खूप फरक असतो आणि त्यामुळे अन्नाची चव खराब होते.

**शिजवलेले अन्न दोन तासांच्या आत फ्रीजमध्ये ठेवा**

जर तुम्ही अन्न शिजवले असेल तर ते थंड करा आणि दोन तासांच्या आत फ्रिजमध्ये ठेवा. अन्न थंड झाल्यानंतर त्यात बॅक्टेरियाची वाढ होऊ लागते. म्हणून जर अन्न दोन तास खोलीच्या तपमानावर ठेवले तर ते खराब होऊ लागते. म्हणून, ते दोन तासांच्या आत फ्रिजच्या आतमध्ये थंड वातावरणात ठेवा.

**फक्त एकदाच गरम करा**

फ्रिजमध्ये ठेवलेले अन्न फक्त एकदाच गरम करा. जर फ्रिजमध्ये जास्त प्रमाणात अन्न असेल तर आवश्यक तेवढे बाहेर काढून गरम करा आणि उरलेले अन्न फ्रिजमध्ये ठेवा. एकदा गरम झाल्यावर ते पुन्हा फ्रिजमध्ये ठेवले तर त्याचे पोषण नष्ट होऊ लागते.

**अन्न पुन्हा फ्रिजमध्ये ठेवू नका**

जर तुम्ही शिजवलेले अन्न रेफ्रिजरेटरमधून बाहेर काढले असेल आणि ते खोलीच्या तापमानात आल्यानंतर ते परत रेफ्रिजरेटरमध्ये ठेवू नका कारण अशा अन्नात बॅक्टेरिया वाढू लागतात आणि नंतर ते खराब होते.

**उघडे अन्न फ्रीजमध्ये ठेवू नका**


जर तुम्ही फ्रिजमध्ये उघडे अन्न ठेवले तर इतर अन्नांवर आणि फ्रिजमध्ये बॅक्टेरिया राहण्याची शक्यता वाढते. त्यामुळे अन्न खराब होते.

**रेफ्रिजरेटरचे तापमान तपासा**

जर रेफ्रिजरेटरमध्ये ठेवलेले अन्न खबरदारी घेतल्यानंतरही खराब होत असेल, तर रेफ्रिजरेटरचे तापमान तपासा. रेफ्रिजरेटरचे तापमान किमान ४ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा कमी असावे. तर अन्न खराब होणार नाही.

■ ■ ■

अशोकायन
प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## रस्त्यावरील खड्डे..!

आंधळं आहे सरकार
बहीरे आहेत अधिकारी
भेसळयुक्त मटेरीयलमुळे
जिवाने जाती पादचारी..

ठेकेदारांनो नाही मनाची
तर जनाची लाज धरा
चार महीन्यात पडावे खड्डे
हे उचित वाटते का गडे?

विदेशी पर्यटक येती
जातात करुन भ्रमती
भारताबद्दल कल्पना करा
ते काय रिमार्क देती ?..

जैसी करणी वैसी भरणी
हा विधात्याचा न्याय
कफन को जेब नही होती
हे विसरुन चालणार नाय..!

## महत्त्वाचे

### गुरु नंदकुमार देशपांडे यांना सांगितीक मानवंदना

**नाशिक ।** सरगम म्युझिक ॲकॅडमीचे संचालक नंदकुमार देशपांडे यांनी असंख्य विद्यार्थ्यांना गायनाचे मार्गदर्शन केले आहे. गुरुपौर्णिमेनिमित्त त्यांच्या ६० विद्यार्थी,



विद्यार्थीनींनी त्यांना सांगितीक मानवंदना दिली. गुरुविण नाही दुजा आधार... या गाण्याने प्रारंभ झाला. पंचवटी कारंजाजवळ लक्ष्मीबाळ सदन येथे सायंकाळी ४.३० वाजता ही मैफल सुरु झाली. गुरुवीण कोण दाखवील वाट...,अमृताहूनी गोड..., अजी सोनियाचा दिनू...,दिव्यत्वाची जेथ प्रचीती तेथे कर माझे जुळती..., मन लागो रे गुरुभजनी..., आकाशी झेप घे रे पाखरा..., माझा भाव तुझे चरणी..., एकवार पंखावरुनी फिरो तुझा हात... यासारखी अनेक समयोचित गाणी तरुणांपासून वयस्कर विद्यार्थ्यांनी सादर केली. या गाण्यांना दमदार तबला साथ शशिकांत बाबरेकर, तालवाद्य साथ अमित गुरव यांनी केली. उत्तरोत्तर रंगलेल्या मैफलीत कैलास काळे यांनी ध्वनी यंत्रणा सांभाळली. संजय किल्लेदार यांनी नंदकुमार देशपांडे यांच्या दीर्घ कला कारकीर्दीचा आढावा घेत निवेदन व सूत्रसंचालन केले. यावेळी सर्व विद्यार्थी, रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहून गायक, संगीतकार असणाऱ्या गुरुवर्य नंदकुमार देशपांडे यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. देशपांडे परिवारातर्फे आभार मानण्यात आले.

### परिपूर्ण नागरिक होण्यासाठी अंगी बाळगा स्वयंशिस्त : डॉ. काळे

**नाशिक ।** यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती आदर व सदभावनाची मूल्य जोपासले पाहिजे. विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जनासाठी कठोर व प्रामाणिकपणाने प्रयत्न केले पाहिजेत




व समाजासाठी काहीतरी चांगले काम करण्याचा प्रयत्न करावा. आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, कठोर परिश्रम करण्याचा संकल्प करण्याचा खरा दिवस गुरुपौर्णिमेचा आहे, परिपूर्ण नागरिक होण्यासाठी अंगी स्वयंशिस्त बाळगली पाहीजे असे मत केटीएचएम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संपत काळे यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमातील मार्गदर्शनपर भाषणात व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यापैकी इयत्ता ११ वीच्या विज्ञान वर्गातील विद्यार्थी महेंद्र सटोने, अमृणी पवार, समृध्दी पवार, भावना वडजे, तनिष्का अहिरे व तेजस्वीनी पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सार्थक ढिकले व क्षितीजा रकिबे यांनी सूत्रसंचालन केले तर त्रिरश्मी खरे यांनी आभार मानले. याप्रसंगी विज्ञान विभागप्रमुख प्रा. किरण रेडगांवकर, डिलिजंट बॅच समन्वयक प्रा. बी.एम. सोनवणे, परीक्षा समिती प्रमुख प्रा. जे. टी. शिंदे, सहकारी प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रतिसादाशिवाय भावनांचा गुंता सुटत नाही : सुतार

**नाशिक ।** प्रतिसादाशिवाय भावभावनाचा गुंता कधीच सुटत नाही, त्यासाठी प्रतिसाद हेच शाश्वत सत्य आहे, असे प्रतिपादन सदाशिव




सुतार यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारक येथे आयोजित पुस्तकावर बोलू काही या अभिनव उपक्रमात सदाशिव सुतार निर्भर या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करत होते. अध्यक्षस्थानी मधुकर गिरी होते. सदाशिव सुतार पुढे म्हणाले की, साहित्यात भावना असतात. या भावना समजून घेण्यासाठी प्रतिसाद मिळाला तर कविता किंवा इतर साहित्यातुन मानवी मनाचा ठाव घेता येतो. भाव संपन्न होण्यासाठी रसीकता आवश्यक असते. भावविश्व समजून घेतले तर निर्भर पणे आपणास समर्पणाची भावना तयार होते.कोणाला किंवा कोणासाठी काही तरी देण्याचा भाव निर्भर असला पाहिजे. साहित्यात प्रतिभा आणि प्रतिबिंब असल्याशिवाय साहित्यात भाव तयार होत नाही. सांकेतिक रेषा आयुष्यात अनेक गोष्टी चा मागोवा दाखवत असते. साहित्यात कलात्मक आनंद असतो, असेही ते म्हणाले. यावेळी संजय दुनबळे आणि सागर बोडके या भाग्यवान विजेत्यांना ग्रंथभेट देऊन सन्मानीत करण्यात आले. सुरेश पवार यांनी सुत्रसंचालन केले. जनार्दन देवरे यांनी आभार मानले. दरम्यान येत्या मंगळवारी १५ जुलै रोजी विनया काकडे माझी या मना या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहेत.

# अशोका हॉस्पिटल समोरील संत सावता माळी महाराज रस्त्यावर निर्माण झाले खड्डे!

**इंदिरानगर ।** प्रभाग २३ मधील अशोका हॉस्पिटल समोरील संत सावता माळी महाराज मार्ग ते वडाळा आरोग्य केंद्राला जोडणारा १८ मीटर डिपी रस्त्यावर पावसामुळे लहान मोठे खड्डे निर्माण झाले आहे. त्यामुळे मार्गक्रमण करणे मुश्कील झाले आहे.

अनेक महिन्यांपासून सदरचा रस्ता डांबरीकरण करण्यास मनपाला विनंती केली. सद्यस्थितीत हा रस्ता दुचाकी चारचाकी सोडाच, परंतु पायी पण चालू शकत नाहीत. वडाळागाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र १०० फुटी रस्त्याला जोडणारा हा रस्ता आहे. दिवसभर वाहनांची व नागरिकांची वर्दळ असते. या रस्त्यावर लहान मोठे खड्डे निर्माण झाले आहे. त्यामुळे वाहनधारक व पादचाऱ्यांना मार्गक्रमण करणे मुश्कील झाले आहे. या ठिकाणी वाहनांचे सतत अपघात होत आहेत. या खड्डेमय रस्त्याची स्थिती लक्षात घेता रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी विलास काश्मीरे, ॲड.राहुल काश्मिरे, किशोर परभणे, प्रविण बांगर, हेमंत मगनानी, अक्षय पाटील आदींनी केली आहे.संततधारेमुळे खड्ड्यामध्ये पावसाचे पाणी साचले आहे, त्यामुळे खड्ड्याचा अंदाज येत नसल्याने लहान-मोठे अपघात होत आहे.

तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी माजी सभागृह नेता चंद्रकांत खोडे यांनी केली. नाशिक पूर्व विभागातील इंदिरानगर परिसरातील अशोका हॉस्पिटलसमोरील-सावित्रीबाई फुले आरोग्य केंद्र १८ मीटर डी.पी. रस्ता तत्काळ दुरुस्त करून डांबरी करणाचे काम मंजूर करणे बाबत मनपा आयुक्तांना निवेदन दिले आहे, असे माजी नगरसेवक ॲड. अजिंक्य साने यांनी सांगितले.



# 'शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झालाच पाहिजे' मागणीसाठी देवळा येथे मोर्चा



**देवळा ।** शेतकऱ्यांचा सात बारा कोरा झालाच पाहिजे, कांद्याला तीन हजार रुपये हमी भाव मिळाला पाहिजे या मागणीसाठी 'प्रहार'चे जिल्हाध्यक्ष गणेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली देवळा येथे पाच कंदील ते प्रशासकीय इमारती पर्यंत पायी मोर्चा काढण्यात आला. तहसीलदार कार्यालयात मोर्च्यांचे रूपांतर सभेत झाले. यानंतर तहसीलदार डॉ. मिलिंद कुलकर्णी यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

महायुतीच्या सरकारने निवडणूक काळात शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. निवडणूका होऊन जवळपास एक वर्ष होत आले असून देखील अद्याप सरकारने आपल्या आश्वासनाची अमलबजावणी केली नाही. सरकार फक्त पोकळ घोषणाबाजी करण्यात माहीर असून, त्यांना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांशी काही देणेघेणे दिसत नाही. शेतमालाला भाव नसल्याने शेतकरी मेटाकुटीस आला आहे. समाधान कारक पाऊस नाही, महागडे बिबियाणे व कर्जाला कंटाळून राज्यात शेतकरी आत्महत्या करीत आहेत. झोपेचे सोंग घेणाऱ्या सरकारला जाग आली पाहिजे, यासाठी संतप्त शेतकऱ्यांच्या उपस्थितीत मोर्च्या काढण्यात आला. या मोर्चाला स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आपला पाठिंबा दर्शविला होता. यात भाऊसाहेब मोरे, शशिकांत पवार, कुबेर जाधव, दीपक पवार, रामा पाटील, दत्ता पवार आदींसह प्रहारचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी तहसीलदार कुलकर्णी यांनी आपल्या भावना शासनस्तरावर कळविण्यात येणार असल्याचे सांगितले. मोर्चात कुठल्याही प्रकारे अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



# मनपाने राबविला स्वच्छतेसह पर्यावरण जनजागृती उपक्रम

## काळाराम मंदिर परिसरात राबविली स्वच्छता मोहीम

**नाशिक ।** गुरुपौर्णिमेचे पावन औचित्य साधत नाशिक महानपालिकेच्या पर्यावरण विभागातर्फे पर्यावरण संरक्षण आणि स्वच्छतेविषयी जनजागृतीसाठी "माझी वसुंधरा ६.०" व केंद्र शासनाच्या "सफाई अपनाओ, बिमारी भगाओ (SABB) २०२५" या उपक्रमांतर्गत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

मनपा आयुक्त मनिषा खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष मोहिमेचेआयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाची सुरुवात राजीव गांधी भवन येथून उपायुक्त नितीन नेर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आली. सायकल रॅलीद्वारे पर्यावरण संदेश देत काळाराम मंदिर परिसरात सायकलिस्ट फाउंडेशन, मनपा शाळा क्र. १०, पीव्हीजी महाराष्ट्र विद्यालय, क्वालिटी सिटी नाशिक, गेटवे ताज ग्रुप यांच्या सहकार्याने स्वच्छता व प्लास्टिकमुक्तीची कार्यवाही पार पडली. स्वच्छता उपक्रमात सुमारे १५०-२०० विद्यार्थी व नागरिकांनी सहभाग घेतला. मंदिर परिसरात कचरा व्यवस्थापन, प्लास्टिक निर्मूलन आणि पर्यावरण जनजागृतीचे संदेश दिले गेले. यावेळी महंत कुंभमेळा प्रवक्ते महंत भक्तीचरणदास महाराज यांनी सिंहस्थ कुंभमेळाच्या पार्श्वभूमीवर नाशिक स्वच्छ व प्लास्टिकमुक्त ठेवण्याचा संकल्प विद्यार्थ्यांना पटवून दिला. अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर (IAS) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वच्छतेची सवय बालवयात रुजवावी, गणपती उत्सवात शाडू मातीच्या मूर्तींचा वापर करावा, कृत्रिम तलावातच विसर्जन करावे, कचऱ्याचे योग्य विलगीकरण करून घंटागाडीत द्यावे, असे स्पष्ट संदेश दिले. कार्यक्रमाला काळाराम मंदिराचे विश्वस्त मंदार जाणोरकर, शुभम मुठाळ, मयूर कलाल यांचे विशेष सहकार्य लाभले.

याशिवाय क्लिनिटोलच्या प्रिया डिगरसे व नीतेश नारायणी, क्वालिटी सिटी व गेटवे ताज ग्रुपचे प्रतिनिधी, मनपाचे कार्यकारी अभियंता राजेंद्र शिंदे, राहुल बोबे, प्रल्हाद हंकारे, तसेच अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सांगता गेटवे ताज ग्रुपतर्फे विद्यार्थ्यांना श्रमपरिहार देऊन करण्यात आली.

# खड्ड्यात वृक्षारोपण करीत मनसेकडून मनपाचा निषेध

## खड्डेमुक्त रस्ते न झाल्यास तीव्र आंदोलन



**नाशिक ।** नाशिक शहरातील सर्वच रस्त्यांना खड्डे पडले असून, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सिडको-नवीन नाशिक विभाग, सातपूर विभाग, नाशिक मध्य विभाग, नाशिक रोड आणि पंचवटी या विभागात रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये वृक्षरोपण करीत मनपा प्रशासनाचा निषेध केला. मनसेच्या या अनोख्या आंदोलनाने नागरिकांचे लक्ष वेधले गेले.

शहरातील रस्त्यांची झालेली दुरावस्थेच्या विरोधात रस्त्यांवर पडलेले खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण तसेच खड्ड्यात साचलेल्या पाण्यात प्रतिकात्मक जाळ टाकून मासे पकडून प्रशासनाचा निषेध करण्यात आला. लवकरात लवकर हे सर्व रस्ते खड्डे मुक्त व्हावे, अशी मागणी करण्यात आली. खड्डे त्वरित न बुजविण्यास अजून लोकशाही मार्गाने नाशिक महापालिकेच्या विरोधात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे देण्यात आला. याप्रसंगी प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील, प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, महिला सेना प्रदेशाध्यक्ष सुजाता डेरे, शहर समन्वयक भाऊसाहेब निमसे, जिल्हा उपाध्यक्ष मनोज घोडके, जिल्हा सचिव संदेश जगताप, नाशिक पश्चिम विधानसभा निरीक्षक संदीप दोंदे, विभाग अध्यक्ष सत्यम खंडाळे, सचिन सिन्हा, नितीन माळी, योगेश दाभाडे, बंटी कोरडे, धीरज भोसले,उपशहर अध्यक्ष अविनाश पाटील, गणेश कोठुळे, विशाल भावले, जावेद शेख, मिलिंद कांबळे, बाजीराव मते, नितीन पंडित,शशिकांत चौधरी, नितीन दानापुणे, कैलास मोरे, दीपक मोकळ, राजू परदेशी, भालचंद्र देसले, कौशल पाटील, निलेश सहाणे, ज्ञानेश्वर बगडे, लक्ष्मण साळवे, किशोर वडजे, गोकुळ नागरे, प्रफुल बनभैरू, अविनाश जाधव, राहुल पाटील, राहुल घोडे, विजय बोराडे, महिला सेना जिल्हाध्यक्ष ज्योती शिंदे, शहराध्यक्ष अरुणा पाटील, भानुमती अहिरे, स्वागता उपासनी, पद्मिनी वारे, स्वप्निल शहाणे, मनोज सोनवणे, विराज आंबेकर, पंकज पाटेकर, संजय हंडोरे, रंजन पगारे, गणेश जायभावे, अरुण मिस्त्री, वैभव रौंदळ, अमोल गोजरे, प्रवीण अहिरे, सागर भागवत, मनीष परदेशी, आकाश भागवत, सुजित बडगुजर, हिम्मत पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# आ. सुहास कांदे यांनी वाहतूक कोंडीचा प्रश्न विधानसभेत मांडला

**मनमाड ।** शहरातील वाहतूक कोंडी, अपघातांचे वाढते प्रमाण आणि जुना व कमकुवत रेल्वे ओव्हर ब्रीज पूल यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांच्या व्यथा अखेर विधानसभेच्या पटलावर पोहचल्या आहेत. नांदगाव मतदारसंघाचे आमदार सुहास कांदे यांनी महाराष्ट्र विधानसभेत मनमाड शहरातील वाहतूक कोंडी, उड्डाणपूल, राष्ट्रीय महामार्ग, बाह्यवळण रस्त्याची तातडीने आवश्यकता यासंबंधी लक्षवेधी सूचना मांडली.





आमदार कांदे म्हणाले, "मनमाड हे व्यापारी, औद्योगिक व धार्मिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे शहर आहे. इंदूर-पुणे महामार्ग, शिर्डी, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी वाहतूक शहराच्या मध्यभागातून जाते. या मार्गावरच भारत पेट्रोलियम, इंडियन ऑइल, हिंदुस्थान पेट्रोलियमचे गॅस बॉटलिंग प्लांट तसेच अन्नधान्य महामंडळाचे मोठे गोदाम आहे. त्यामुळे दररोज किमान २५ हजार वाहने या मार्गावरून प्रवास करतात." या रस्त्यावरच ६० वर्षांपूर्वी बांधलेला रेल्वे पूल आहे, जो सध्या अत्यंत जिर्ण झाला असून दीड वर्षांपूर्वी त्याचा काही भाग कोसळला होता. या पुलावरूनही दररोज मोठ्या प्रमाणात अवजड वाहने जात असल्याने तो आणखी धोकादायक बनत चालला आहे. वाहतूक कोंडी आणि रस्त्याची अडचण ही केवळ गैरसोयीपुरती मर्यादित नसून, ती जीवघेणी ठरत असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. सन २०२२ : २१ अपघात, १२ मृत्यू, सन २०२३ : १५ अपघात, २० मृत्यू, सन २०२४ : १० अपघात, २० मृत्यू, २०२५ (सप्टेंबर अखेरपर्यंत) : ७ अपघात, ८ मृत्यू होवून या अपघातांत अनेकजण जखमी होऊन कायमचे अपंग झाले. एका




अपघातात एका कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला. कोंडीत अनेकदा रुग्णवाहिका अडकतात, त्यामुळे गंभीर रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण होतो. शाळकरी विद्यार्थी, कार्यालयीन चाकरमानी, व्यापारी वर्ग आणि सामान्य नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. या गंभीर प्रश्नावर आमदार कांदे यांनी बाह्यवळण रस्त्याच्या निर्मिती, मालेगाव चौफुली ते ट्रेनिंग कॉलेज दरम्यान उड्डाणपूल उभारणे, आणि प्रस्तावित चौपदरीकरण व रेल्वे पूलाचे दुरुस्ती काम हाती घेण्याची गरज स्पष्ट केली. या लक्षवेधी सूचनेवर सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्यमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच उपाययोजना करण्यात येतील, अशी ग्वाही दिली आहे.

**शेतीशी संबंधित पुढे आलेले अलिकडचे तीन मुद्दे लक्षवेधी म्हणावे लागतील. पहिली बाब म्हणजे गेल्या तीन महिन्यांमध्ये ७५३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे. दुसरे म्हणजे दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्यांना मोफत अन्न पुरवले जात असूनही कुपोषणात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. अशात अलिकडेच राज्याच्या कृषीमंत्र्यांनी शेती परवडत नसल्याचे विधान केले आहे. याचा अन्वयार्थ काय?**

# शेतकरी वाऱ्यावर...?



सध्याच्या हंगामात दोन आश्चर्यकारक घटना घडल्या. एक म्हणजे अवकाळी पावसाने दुष्काळी पट्ट्यामध्ये ढगफुटीसारखा प्रचंड पाऊस पडला. प्रत्यक्ष पावसाळा सुरू झाल्यानंतर सुरूवातीच्या काळातही चांगला पाऊसकाळ बघायला मिळाला आणि अनेक भागांमधील पिण्याचा प्रश्न सुटला. पण दुसरीकडे विधानसभेतील चर्चेदरम्यान महत्त्वपूर्ण माहिती पुढे आली. तेव्हा प्रथम मानवजातीला कलंक असणाऱ्या या घटनेचा विचार करु या. कुपोषण आणि शेतकरी आत्महत्या हे महाराष्ट्राला अत्यंत भेडसावणारे प्रश्न आहेत. एखादी घटना घडल्यानंतर थोडीफार चर्चा होते आणि विषय संपतो. परंतु या वेळचे गांभीर्य वेगळे असल्यामुळे वर्तमानपत्रांनाही दखल घ्यावी लागली. गेल्या अवघ्या तीन महिन्यांमध्ये ७५३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची बातमी असून दुसरी वार्ता देशाचा विचार करता महाराष्ट्रामध्ये कुपोषण सर्वात जास्त असल्याचेही समोर आले आहे. या आकडेवारीने आपल्याला हादरा दिला आहे. वास्तविक, पंतप्रधानांनी आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोकांसाठी फुकट अन्नधान्य वाटण्याची सोय केली असतानाही कुपोषणाची समस्या शिल्लक राहते, याचा अर्थ नियोजनात निश्चितच काही तरी गफलत आहे, असा लागतो.

शेतकरी आत्महत्या ही जुनाट समस्या असली तरी त्यावर उपायच नाही असे नाही. मग या प्रश्नाकडे केंद्र आणि राज्य शासन गांभीर्याने का पहात नाही? सुधीर मुनगंटीवार हे भाजपाचे वरिष्ठ नेते असून अभ्यासकदेखील आहेत. त्यांनी या प्रश्नावरील उत्तर म्हणून शेतकरी गुन्हेगारी न्यायालय आणि शेतीप्रश्नांसाठी स्वतंत्र न्यायालय स्थापण्याची मागणी केली आहे. अशा स्वरुपाची ही पहिली मागणी असल्यामुळे दखलपात्र ठरते. आम्ही गेले काही दिवस शेतकरी संरक्षण कायदा व्हावा यासाठी चळवळ करत आहोतच. याला हे विधान पूरक म्हणावे लागेल. आज शेतकरी जगातील ६४ टक्के भाग व्यापत असला तरी सध्याचे कायदे त्यांचे सगळे प्रश्न सोडवण्यास अपुरे आहेत, हे अनेक देशांना पटल्यामुळे अमेरिकेने शेतकरी समाजाच्या संरक्षणासाठी 'इर्मा' कायदा केला आहे. इस्त्रायल हा ९० लाख लोकवस्तीचा देश आहे. १९४८ पासून आजपावेतो तो युद्धाने ग्रस्त आहे. मात्र त्यानेही आपल्या शेतकरी समाजासाठी अग्रेस्को कायदा केला आहे. हीच गोष्ट नेदरलँड आणि न्युझिलंडसारख्या देशांनीही आपल्याकडील दुग्ध व्यवसायाला संरक्षण देण्यासाठी केलेल्या कायद्याद्वारे केली आहे. ब्राझीलने इतक्या दूरवरुन युरोपची बाजारपेठ काबीज केली, याला त्या देशाने केलेले शेतकरी संरक्षण कायदेच उपयुक्त ठरले आहेत.

**नोंद**

**डॉ. प्रा. मुकुंद गायकवाड**, कृषिततज्ज्ञ

जगामध्ये १९३ देश कमी-अधिक प्रमाणात शेतीवरच अवलंबून आहेत. अगदी आफ्रिकेतील देश तसेच पूर्वेकडील म्यानमार, थायलंड, कंबोडिया, व्हिएतनाम, कोरिया, चीन अशा देशांचा विचार केला तर कधी काळी शेतीक्षेत्रामध्ये आपल्यापेक्षा पिछाडीवर असणारे हे देश आज आघाडीवर आहेत. आपण कडधान्याबाबत स्वयंपूर्ण नसल्यामुळे म्यानमारकडून तूरडाळ आयात करतो. मलेशिया, इंडोनेशियाकडून खाद्यतेल आयात करतो. भात कमी पडला तर फिलिपिन्सकडून आयात करतो. कांद्याचे भाव वाढल्यास पाकिस्तानातून कांदा आयात करतो. या पार्श्वभूमीवर चीनचे शेतीतील उदाहरण बोलके आहे. आज चीन शेतीमालाचे आपल्यापेक्षा तीनपट अधिक उत्पादन घेतो. म्हणजेच त्यांची प्रत्येक पिकामध्ये दर एकरी उत्पादनक्षमता आपल्यापेक्षा तिप्पट आहे. पण तरीदेखील तो जनतेला कुपोषणापासून वाचवण्यासाठी अन्नधान्याची निर्यात करत नाही. उलट, लागली तर आयातच करतो. खरे तर ही बाब शिकण्याजोगी आहे. पण तसे होत नाही. गेली ७५ वर्षे प्रयत्न करुनही आपण डाळी आणि तेलबियांच्या उत्पादनात काहीही प्रगती केलेली नाही. चीनने अमेरिकेचे कृषी विद्यापीठाचे मॉडेल घेतले नाही तर आपली नवी कृषी पद्धती आणि यंत्रणा निर्माण करुन अग्रस्थान मिळवले. त्याचप्रमाणे इस्त्रायलनेही अमेरिकेची पद्धत न घेता स्वतंत्र व्यवस्था निर्माण केली आणि यशाचे शिखर गाठले. मग आपण याचे अनुकरण का करत नाही, हा प्रश्न उरतो. आज महाराष्ट्रातील 'महात्मा फुले कृषी विद्यापीठ' हे पहिले विद्यापीठ देशातील कृषी विद्यापीठांमध्ये सर्वात शेवटच्या क्रमांकावर आहे. राज्यातील चार कृषी विद्यापीठे पांढरे हत्ती ठरत आहेत. याचा महाराष्ट्रातील जनता आणि सरकार कधी विचार करेल का?

कायद्याबाबत बोलायचे तर भारतामध्ये आजतागायत ब्रिटिशांनी केलेले कृषी कायदेच लागू आहेत. १९४३ मध्ये बंगालमध्ये दहा लाख भूकबळी गेले. असे असतानाही ब्रिटिशांनी शेतकऱ्यांसाठी कोणतेही उपयुक्त कायदे केले नाहीत. जगात कोठे नव्हे इतक्या शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात होत आहेत. पण तरीदेखील राज्य आणि केंद्र सरकार इतर देशांचा अभ्यास करुन आपल्या शेतकऱ्यांना मुक्त अर्थव्यवस्थेचा लाभ देण्याचा विचार करत नाही. उलट, त्यांना जखडून ठेवले. त्यामुळे आपल्याकडील शेतीची प्रगती होताना दिसत नाही. आज आपण दोन लाख ३२ हजार कोटी रुपयांचे खाद्यतेल परदेशातून विकत घेतो. आपल्या शेतीतील पिकू शकणाऱ्या जवळपास २०० वस्तू आयात करतो. तरीदेखील आपली अर्थव्यवस्था जगात चौथ्या क्रमांकावर पोहोचली आहे. म्हणजेच इतर देशांप्रमाणे भारताने शेतीला महत्त्व दिले तर हीच अर्थव्यवस्था जगात पहिल्या क्रमांकावर आल्याखेरीज राहणार नाही, हे स्पष्ट आहे. पण याचा विचार होत नाही. तेव्हा या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.



कृषीमंत्री माणिकराव कोकाटे शेती परवडत नाही, असे म्हणतात. तसे पाहिले तर औद्योगिक क्रांती झाल्यानंतर म्हणजेच १७५० पासून आजपावेतो अमेरिकेमध्ये शेती करणाऱ्या लोकांची संख्या अवघ्या दोन टक्क्यांवर आली आहे. युरोपमध्ये हे प्रमाण पाच टक्क्यांवर आले आहे. परंतु आपली शेतीतील लोकसंख्या मात्र ६४ टक्क्यांवर कायम आहे. आपल्याकडे नद्यांची सुपीक क्षेत्रे आहेत. पण तेथील लोक शेतीकडे न बघता मोठ्या शहरांकडे धाव घेत आहेत. याचे कारण उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या राज्याच्या सरकारने शेतीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात दडले आहे. महाराष्ट्राचे मात्र तसे नाही. इथे दूध उत्पादकांनी देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. फळे, भाजीपाला, ऊस या क्षेत्रातही राज्य पहिल्या क्रमांकावर आहे. आपल्या राज्यामध्ये सर्वात जास्त धरणे बांधली गेली आहेत. पश्चिमेकडे समुद्रात वाहून जाणारे पाणी पूर्वेकडे वळवण्याचाही सरकारचा विचार आहे. फडणवीस सरकारने सत्तेत आल्यानंतर नदी जोड प्रकल्पाला अग्रक्रम दिला आहे. असे असूनही राज्याचे शेतीमंत्री शेती परवडत नसल्याचे कसे म्हण-तात, हा प्रश्न विचारायला हवा. त्यांच्या या विधानाचा सखोल अभ्यास व्हायला हवा.

शशी थरुर या अभ्यासू नेत्याने आपल्या पुस्तकामध्ये एक गंभीर आकडेवारी दिली आहे. त्यांनी म्हटल्याप्रमाणे देशातील महसूल विभागामध्ये प्रचंड खटले प्रलंबित असून आजोबांनी दाखल केलेली केस नातू-पणतूपर्यंत सुटत नाही. याचाच अर्थ केवळ व्यापारीच शेतकऱ्याचे शोषण करतात असे नाही, तर सरकारही तेच करत आहे. जसे की, आपल्याकडे जगात कुठेही नसणारी रुमाल टाकून भाव ठरवण्याची पद्धत कायम आहे. सरकारकडून त्याविषयी कोणताही कायदा करण्यात आलेला नाही. आज वन्यप्राणी शेतीचे नुकसान करतात. त्यांच्यापासून शेतीला संरक्षण देणे ही सरकारची जबाबदारी आहे. पण याबाबत कोणतेही कायदे नाहीत. शेतकऱ्यांना याबाबत वाऱ्यावर सोडले गेले आहे. विमा योजनेचा प्रचंड घोळ असून सरकारने जाहीर केलेली 'एक रुपयात विमा योजना' बंद करावी लागली आहे. अशा वेळी आयुर्विमा योजना यशस्वी होते, तर शेतीचा विमा का यशस्वी होत नाही, हा प्रश्न पडतो. ग्राहक कायद्यामुळे आज ग्राहकाला संरक्षण मिळाले आहे. ट्रॉसिटी कायद्यामुळे हरिजनांना संरक्षण मिळाले आहे. मात्र मोकळ्या आकाशाखाली निसर्गाच्या मर्जीवर व्यवसाय अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्याला अनेक मार्गाने होणाऱ्या शोषणापासून वाचवण्यासाठी कोणतेही संरक्षण मिळत नाही. एखाद्याची विहिरीला लावलेली मोटार चोरीस गेली, कोणी पिकाची चोरी केली तर त्याला संरक्षण मिळत नाही. इथे मी स्वत:चे उदाहरण देतो. शेतीशास्त्रज्ञ आणि पिके घेणारा प्रगतीशील शेतकरी असूनही मी हतबल झालो आहे, कारण सर्वसामान्य व्यावसायिकांप्रमाणे मला दिवसा वीज मिळत नाही. त्यासाठी रात्री शेतात जावे लागते. पिकाची चोरी झाली तर कुठेही दाद मागता येत नाही. खेड्यांमध्ये आजही ज्याच्या हाती ससा तो पारधी, अशीच पद्धत आहे. त्यामुळे आता सज्जन माणसाला खेड्यात राहणे कठीण होत आहे. शेतीसाठी स्वतंत्र न्यायालय आणि न्यायव्यवस्था उभी राहिल्याखेरीज हे प्रश्न सुटणे शक्य नाही.

✦✦✦

**अगदी काल-परवापर्यंत आपल्या मुलांसह व्हाईट हाऊसमध्ये सुखनैव संचार करणारे इलॉन मस्क यांचे ट्रम्प महोदयांशी मतभेद झाले आणि दोघांनी एकमेकांवर आगपाखड केलेली जगाने पाहिली. आता मस्क यांनी 'अमेरिका पार्टी' या आपल्या नव्या राजकीय पक्षाची स्थापना केली आहे. दुसरीकडे ट्रम्प यांचा टॅरिफबाबतचा नरमाईचा सूर पाहायला मिळतो आहे. या महत्त्वपूर्ण घटनांचे विवेचन करण्यासाठी हा लेखप्रपंच**

# अमेरिकेच्या अंगणातून...





जागतिक महासत्ता असणाऱ्या अमेरिकेतील घडामोडींकडे संपूर्ण जगाचे लक्ष असते. त्यामुळे ट्रम्प यांच्या छोट्या-मोठ्या घोषणा, टॅरिफसंदर्भातील बदलते निर्णय तसेच मस्क यांच्याशी संबंध ताणले जाणे, मस्क यांनी आपला नवा राजकीय पक्ष स्थापन करणे या आणि यासारख्या घटनांचा परामर्श अलिकडे गांभिर्याने घेतला गेला. विसाव्या शतकात अमेरिका हा जगातील सर्वात मोठा वर्चस्ववादी देश होता. या वर्चस्वाचा, आपल्या लष्करी-आर्थिक ताकदीचा वापर करुन त्यांनी संपूर्ण जगावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या साह्याने त्यांनी जगावर नवीन आर्थिक धोरण लादले. त्याचा लाभ गुगल, फेसबुक, मायक्रोसॉफ्ट यासारख्या मल्टीनॅशनल कंपन्यांना झाला. या कंपन्यानी नफा वाढवलाच, खेरीज विस्तारही केला. युरोपच्या साह्याने अमेरिकेने इतर देशांमध्ये गुंतवणूक करुन इतर देशांमध्येही आपला नफा कायम राहण्याची व्यवस्था केली. पण कालांतराने चीन, भारत, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम आदी देशांची ताकदही वाढू लागली. त्यामुळे आजमितीला जगात अमेरिका हीच एकमेव महाशक्ती असल्याची परिस्थिती राहिलेली नाही. स्वाभाविकच अमेरिकेतील लोकांना याचे वैषम्य वाटू लागले. विशेषत: १९८५ नंतर जगात आलेल्या नव्या आर्थिक धोरणानंतर जगातील सर्व देशांचे एकमेकांवरील अवलंबित्व वाढले. विसाव्या शतकात आपण आपली व्यवस्था निर्माण करु शकतो, असा आत्मविश्वास अनेक देशांना होता. पण २१ व्या शतकात तो डळमळीत झालेला दिसत आहे. जागतिक पातळीवर एकमेकांना मदत केल्याखेरीज आपली अर्थव्यवस्था सुधारु शकत नाही तसेच टिकूही शकत नाही, हे आता देशांच्या लक्षात आले आहे. मात्र अमेरिकन वर्चस्ववाद्यांना या वास्तवाचा स्विकार करणे कठीण होते. त्यामुळे जगावर आपले वर्चस्व कायम राखण्याकडे त्यांचा ओढा होता. तशी रचना शोधण्याच्या प्रयत्नातूनच ट्रम्प यांचा उदय झाला आहे.




जागतिकीकरणामध्ये पुढारलेल्या देशांची लोकसंख्या घटू लागली वा स्थिर झाली. त्यामुळे बाहेरच्या देशांमधून त्यांच्याकडे येणारी श्रमशक्ती वाढली. यातूनच अशा देशांमध्ये निर्वासित, स्थलांतरितांचा प्रश्न निर्माण होऊन हळूहळू गंभीर बनला. ही बाब एवढ्यापुरतीच सीमित राहिली नाही. पैसे कमावू इच्छिणाऱ्या मोठ्या विद्यापीठांनीही यासाठी बाहेरचे विद्यार्थी घेण्यास प्राधान्य दिले. बाहेरचे विद्यार्थीही उपलब्ध संधी लक्षात घेऊन मोठ्या संख्येने येऊ लागले आणि आणखी एका प्रश्नाने जन्म घेतला. म्हणूनच आपले पूर्वीचे स्थान मिळवण्यासाठी, इतर देशांच्या प्रगतीवर अंकुश ठेवून पुन्हा प्रथम क्रमांकाचा देश ठरण्यासाठी अमेरिकेने ट्रम्प या प्रवृत्तीला जन्माला घातले. मात्र कोणत्याही एका देशाने जगाला नियंत्रित करण्याची बाब नवीन तंत्रज्ञानाच्या विश्वात अशक्य असल्याचे ते विसरले. अमेरिकेचे हे स्वप्न स्वप्नच राहणार असून कधीच सत्यात उतरु शकणार नाही. आता बाकीचे जग त्यांच्या दादागिरीला घाबरणार नाही.

दुसरीकडे अमेरिकेत रिपब्लिकन पक्ष इतका मजबूत झाला आहे की विरोधी डेमोक्रॅटिक पक्ष त्याला विरोध करु शकेल की नाही, हा प्रश्न निर्माण झाला आहे. हे हेरुन मस्क यांनी वेगळा पक्ष काढून आपली भूमिका लोकांसमोर नेण्याचा प्रयत्न केला आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्य करुन पुढे जायचे की दादागिरी करुन पुढे जायचे हे त्यांच्यामधील वाद असून नवी पक्ष निर्माण करुन आता मस्क यांनी यात उडी घेतली आहे. मीडिया दाखवत नसला तरी आजही जगातील विविध देशांमध्ये ७०० पेक्षा अधिक तळ असणारा देश म्हणजे अमेरिका. अन्य कोणत्याही देशाचे इतके परदेशी तळ नाहीत. अलिकडेच अमेरिकेने इराणवर हल्ला केला तेव्हा मध्य आशियात त्यांचे ४० हजार सैनिक असल्याचे जगासमोर आले. म्हणजे लष्करी सामर्थ्याच्या बळावर त्यांनी अशा प्रकारे जगावर वर्चस्व राखले आहे. आज तरी त्यांच्या या सामर्थ्याला पर्याय नाही. त्याचा फायदा घेत ट्रम्प एकीकडे अमेरिकेतील व्यापाराची शक्ती वापरण्याचा प्रयत्न करत आहेत तर दुसरीकडे, लष्करी शक्तीच्या आधारे दमदाटी करुन अन्य देशांना दाबात ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. असे असताना मस्क यांची अडचण होणे स्वाभाविक होते. यातूनच आता त्यांच्या नव्या पक्षाचा जन्म झाला आहे, असे म्हणता येईल.

ट्रम्प यांच्या धोरणांमुळे अमेरिका आणि चीनचे संबंध तणावग्रस्त झाले. ही बाब मस्क यांच्या फायद्याची नाही, कारण त्यांचा संपूर्ण व्यवसाय चीनच्या पाठब्यावर अवलंबून आहे. असेच होत राहिले तर आज ना उद्या चीन आपल्याला त्रास देईल, हे लक्षात घेऊन त्यांनी ट्रम्प यांच्यापासून दूर जाण्याचा निर्णय घेतला. त्यांनी व्हाईट हाऊसपासून फारकत घेतली. पण यानंतरही ट्रम्प थांबले तर ठीक, अन्यथा वेगळा मार्ग अवलंबण्याची दृष्टी नवा राजकीय पक्ष स्थापण्यामागे आहे. याखेरीज ट्रम्प यांच्या दृष्टीने बघायचे तर अमेरिकन अर्थव्यवस्था आता बऱ्याच अंशी चीनवर अवलंबून आहे. त्यामुळेच चीनवर भरभक्कम आयात कर लावला आणि प्रत्युत्तरादाखल चीननेही अमेरिकेवर त्या प्रमाणात आयात कर लादला तर अमेरिका अडचणीत येण्याची दाट शक्यता आहे. म्हणूनच आयात करात वाढ करण्यासंदर्भात सतत मुदतवाढ देत राहण्याखेरीज ट्रम्प यांच्याकडे कोणताही पर्याय राहिल्याचे दिसत नाही. ते छोट्या छोट्या देशांवर दादागिरी करु शकतील. त्यांची अर्थव्यवस्था आपल्या ताब्यात असल्याच्या भ्रमात राहून ते अगदी भारतासारख्या देशावरही दादागिरी करु शकतील. पण चीन आणि रशियासारख्या देशांवर त्यांच्या दादागिरीचा काहीही परिणाम होणार नाही. रशियावर निर्बंध लादूनदेखील हा देश युद्धाबाबत त्यांचे काही ऐकत नसल्याची बाब हेच सिद्ध करते. युरोपनेही हळूहळू आपली वाट वेगळी करायला सुरूवात केली आहे. म्हणूनच आपले वर्चस्व कायम ठेवण्यासाठी अमेरिकेला आता कोणती रचना करावी, याविषयी पुन्हा एकदा चर्चा करावी लागणार आहे.

**पैलू**

**डॉ. भालचंद्र कानगो**, राजकीय विषयांचे जाणकार

थोडक्यात, अमेरिकेचे वर्चस्व कमी झालेले नाही, तर त्यांच्या तोडीस तोड चीन, रशिया, भारत, ब्राझिल असे इतर देशही विकसित होऊ लागले आहेत. खरे तर इतर देशांचा विकास हेच २१ व्या शतकाचे वैशिष्ट्य आहे. अमेरिकेला हे वास्तव स्विकारणे जड जात आहे. ट्रम्प यांच्यासारख्या लोकांना उभे करण्यामागे हाच विचार होता. पण आता त्यांनाही देशांतर्गत विरोधाला सामोरे जावे लागत आहे. त्यातही परीक्षा म्हणजे त्यांच्याकडे नोव्हेंबर महिन्यामध्ये सिनेटच्या निवडणुका होणार आहेत. सध्या सिनेट आणि काँग्रेसमध्ये रिपब्लिकन पक्षाचे बहुमत आहे. त्यामुळे ट्रम्प यांची दादागिरी खपून जात आहे. पण या निवडणुकीमध्ये एका सभागृहातही त्यांच्या पक्षाचा पराभव झाल्यास बिले संमत करणे कठीण जाईल. अशा प्रकारे अडचणी निर्माण करण्याचाच विरोधकांचा प्रयत्न आहे. मात्र मस्क यांच्या नव्या पक्षामुळे यात अडचणी निर्माण होऊ शकतात. अर्थात या नव्या पक्षाचा फटका ट्रम्प यांना बसेल की डेमोक्रॅट्सना, यावर अमेरिकेचे भवितव्य अवलंबून आहे. आपल्याला मानणारे अनेक लोक असल्यामुळेच आपण सत्तेत आलो आहोत, असे ट्रम्प यांना वाटते. पण मस्क यांनी स्वतंत्र पक्षाद्वारे वेगळी भूमिका घेतली तर निश्चितच अडचणीत सापडतील. म्हणूनच अमेरिकेसाठी नोव्हेंबरच्या या निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्यातही सिनेटमध्ये ट्रम्प यांच्या पक्षाकडे खूप कमी फरकाचे बहुमत असल्यामुळे काटें की टक्कर राहणार, यात शंका नाही. त्यामुळेच इलॉन मस्क यांनी नव्या पक्षाची स्थापना करुन ट्रम्प यांना आव्हान देण्याचे ठरवले आहे.

खरे तर इलॉन मस्क यांना ट्रम्प यांचा मोठा साथीदार, पाठबा देणारा म्हणत मीडियानेच डोक्यावर घेतले होते. परंतु, नंतर अमेरिकेतील लोकांनीच मस्क यांच्या टेस्ला कारवर बहिष्कार घालण्याची मागणी करत चळवळ उभी केली. म्हणजेच तिथे मस्क यांना विरोध करणारा एक गट आहेच. तो किती मजबूत आहे, याविषयी इथे बसून फार काही बोलता येणार नाही. पण डोनाल्ड ट्रम्प ज्या पद्धतीने मस्क यांच्यावर तुटून पडले आहेत, ते बघता त्यांना मस्क यांच्या ताकदीची कल्पना आहे, याबाबत शंका नाही. शेवटी पैशाची ताकद मोठी असतेच. तो निवडणुकीत ट्रम्प यांच्या विरोधात वापरला गेल्यास ते नक्कीच अडचणीत येऊ शकतात. हे सगळे लक्षात घेता येत्या दोन-तीन महिन्यांमध्ये ट्रम्प आणि मस्क यांच्यातील भांडण अधिक उग्र होईल, असा अंदाज आहे. त्यानंतर कोण हरते आणि कोण जकते यावर परिस्थिती कशी कलाटणी घेईल हे ठरेल.

✦✦✦

# विदर्भातील सिंचन अनुशेष
## वास्तव आणि विसंगती



महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवांनी १६ एप्रिल २०२५ रोजी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सादर केलेल्या शपथपत्रात अमरावती व वाशीम जिल्ह्यांचा सिंचन अनुशेष पूर्णतः संपुष्टात आला आहे, असा दावा केला.

या विधानानंतर विदर्भातील शेतकऱ्यांमध्ये, जलसिंचन चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये आणि अभ्यासकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली. या दाव्यावर कठोर टीका करताना माजी विधान परिषद सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी ही भूमिका विदर्भातील आत्महत्याग्रस्त व पाण्याच्या बाबतीत उपेक्षित असलेल्या जिल्ह्यांप्रती अत्यंत अशोभनीय आहे, असे स्पष्ट शब्दांत नमूद केले. या सगळ्या प्रकरणाचा मागोवा घेतला असता, जलसिंचन अनुशेष म्हणजे काय, तो मोजण्याची पद्धत काय आणि विदर्भात तो वास्तवात कुठे उभा आहे, हे ठोसपणे उलगडून सांगणे आवश्यक ठरते.

'जलसिंचन अनुशेष' ही संज्ञा कोणाच्या इच्छेनुसार ठरवली जाणारी नसून ती महाराष्ट्र शासनाच्या सत्यशोधन समितीने एका विशिष्ट निकषावर आधारित व्याख्येसह परिभाषित केली आहे. या व्याख्येनुसार, ज्या दिवशी एखादा जिल्हा अद्ययावत राज्य सरासरी सिंचन क्षमतेपर्यंत पोहोचतो, त्या दिवशी तो जिल्हा अनुशेषमुक्त होतो. ही व्याख्या अनुशेष व निर्देशांक समितीनेही मान्य केली आहे.

त्यामुळे अनुशेष हा शब्द आकड्यांवर आधारित आहे; तो भावना, राजकीय गरज किंवा अहवाल लपविण्याच्या हेतूवर आधारित नाही. जलसिंचन अनुशेष ही एक विज्ञानाधारित, आकड्यांवर आधारित आणि धोरणात्मक रचना आहे.

**विदर्भातील वस्तुस्थिती आणि आकडेवारी काय सांगते?**

अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशीम, बुलढाणा आणि वर्धा हे सहा जिल्हे दीर्घकाळापासून सर्वाधिक जलसिंचन अनुशेषग्रस्त म्हणून ओळखले जातात.

या भागात वारंवार दुष्काळ, पावसाचे असमान वितरण आणि अपुऱ्या सिंचनामुळे शेती संकटात आहे. शेतकरी आत्महत्या हा येथे केवळ सामाजिक नाही, तर मानवी हक्कांचा गंभीर प्रश्न ठरला आहे.

२००६ मध्ये तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी विदर्भात प्रत्यक्ष पाहणी करून २१७७ कोटींचा विशेष निधी मंजूर केला होता. हेच दर्शवते की केंद्र सरकारलाही विदभार्चा सिंचन अनुशेष मान्य होता. असे असताना, आता अचानक अनुशेष संपुष्टात आला, असा दावा राज्य सरकार करत असेल, तर तो जनतेच्या डोळ्यात धूळफेक करणारा आहे. विदर्भातील भौतिक व आर्थिक अनुशेष सांख्यीकीय आकडेवारी सविस्तरपणे मांडली आहे.

**भौतिक अनुशेष म्हणजे काय?**

भौतिक अनुशेष म्हणजे राज्याच्या सरासरी विकास पातळीशी तुलना करता एखाद्या जिल्ह्यात अथवा भागात विशिष्ट भौतिक सुविधांचा अभाव असलेले प्रमाण आहे.

हा अनुशेष प्रामुख्याने सिंचन, रस्ते, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य व शिक्षणसुविधा आदी मूलभूत पायाभूत सुविधांमध्ये दिसतो. महाराष्ट्राची सरासरी सिंचनक्षमता सुमारे ३०% आहे.तर विदभार्तील अनेक जिल्ह्यांमध्ये ही क्षमता १०% पेक्षा कमी आहे. उदा., अमरावती, वाशीम, यवतमाळ आणि गडचिरोलीसारख्या जिल्ह्यांमध्ये सिंचनाच्या योजनांचा पुरेसा विस्तार न झाल्यामुळे २०% किंवा त्याहून अधिक भौतिक अनुशेष निर्माण झाला आहे.

याचा थेट परिणाम पीक उत्पादन, शेतीवरील जोखीम आणि स्थलांतरावर होतो. हा अनुशेष म्हणजे राज्य सरासरीप्रमाणे सिंचनक्षमता प्राप्त होण्यासाठी आवश्यक असलेल्या हेक्टर क्षेत्राची संख्या आहे.

उदा. जर राज्य सरासरी सिंचनक्षमता ३०% आहे, एखाद्या जिल्ह्यात ती १०% आहे, तर उर्वरित २०% क्षेत्र हे भौतिक अनुशेषात येते. त्याचप्रमाणे इतर भौतिक अनुशेषांमध्ये विदर्भातील अनेक तालुक्यांमध्ये दर १०० चौ.कि.मी. क्षेत्रामागे रस्त्यांची उपलब्धता राज्याच्या तुलनेत कमी आहे.

आरोग्य केंद्रांची कमतरता आहे. ग्रामीण भागात ५ ते १० हजार लोकांमागे एक प्राथमिक आरोग्य केंद्र असावे, परंतु विदर्भातील काही तालुक्यांमध्ये १५-२० हजार लोकसंख्येमागे एकच केंद्र आहे. दुर्गम भागात उच्च शिक्षण संस्था तसेच वीज पुरवठा अजूनही अपुरा आहे.

**आर्थिक अनुशेष म्हणजे काय?**

आर्थिक अनुशेष म्हणजे विकासासाठी प्राप्त असलेल्या निधीची राज्याच्या सरासरी तुलनेत कमी उपलब्धता अथवा अपुरी गुंतवणूक केली आहे. विदर्भात राज्याच्या अर्थसंकल्पातील हिस्सा तुलनेने कमी आहे आणि खर्चाचे प्रमाणही अपुरे आहे.

**सामाजिक आणि राजकीय परिणाम**

सिंचनाच्या अभावामुळे शेतकरी दुष्काळाशी लढत राहतो. पीक कर्ज, बाजारभाव, आणि नापिकी यामुळे तो मानसिक तणावाखाली जातो. परिणामतः शेतकरी आत्महत्या करतो.
२०१९-२०२३ या ५ वर्षांत विदर्भात १४ हजार ५२७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची आहे. दररोज सरासरी ८ ते ९ शेतकरी आत्महत्या करतात. त्याबद्दल शासनाला संवेदना राहिल्या नाही.

| वर्ष | विदर्भातील शेतकरी आत्महत्या |
|---|---|
| २०१९ | २७४६ |
| २०२० | २५४७ |
| २०२१ | २८९० |
| २०२२ | ३१०३ |
| २०२३ | ३२४१ |

**(एकूण ११ जिल्हे)**
(स्रोतः महाराष्ट्र शासन, कृषी विभाग; राष्ट्रीय गुन्हे नोंद नोंदवही)

सत्यशोधन समितीच्या अहवालानुसार प्रति हेक्टर रक्कम १0,000,अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालानुसार ५0,000, प्राधिकरणाचा २०२०-२१ च्या अहवालानुसार, २,०२,८८६ म्हणजेच आर्थिक अनुशेष २० वर्षांत सुमारे २० पट वाढलेला आहे, आणि यावर सरकारकडून कुठलाही ठोस कार्यक्रम वा गुंतवणूक दिसत नाही.

**अमरावती विभागाचा अनुशेष ५१ पट वाढ!**

प्रा. बी. टी. देशमुख यांनी दिलेल्या नुटा बुलेटिन मधील माहितीनुसार १९८२ साली अमरावती विभागाचा सिंचन अनुशेष ४१७ कोटी होता. तर २०२५ मध्ये अधिकृत आकडेवारीनुसार २१५४० कोटीचा अनुशेष आहे.

याचा अर्थ मूळ आर्थिक अनुशेष ५१ पटीने वाढला आहे. जर हा अनुशेष संपुष्टात आलेला असता, तर या आकडेवारीचा काही संबंध राहिला नसता हे मात्र खरं.

**राजकीय विधानांमागील हेतू वास्तव लपविण्याचा प्रयत्न?**

राज्य सरकारच्या वतीने उच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या शपथपत्रात अमरावती व वाशीम जिल्ह्यांचा सिंचन अनुशेष संपुष्टात आला आहे, असा दावा करण्यात आला आहे.

हा दावा केवळ तांत्रिक आणि कागदोपत्री आकडेवारीवर आधारित असून, प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या अनुभवाशी त्याचा काहीही संबंध नाही. विशेषतः आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून अशा प्रकारचे दावे करून विदर्भातील जनतेसमोर आपल्यासाठी सर्व काही केले गेले आहे, अशी चुकीची प्रतिमा निर्माण करण्याचा हेतू स्पष्ट जाणवतो. यामागे वास्तव लपविण्याची धडपड आहे, अशी शंका निर्माण होते.

हे राजकीय विधान केवळ जनतेची दिशाभूल करत नाही, तर शासनाच्या धोरणात्मक दुर्लक्षाचे आणि जबाबदारी नाकारण्याचे संकेतही देते. कारण शेतकरी आजही कोरडवाहू शेतीवर अवलंबून आहे, त्याला हमीभाव नाही, कर्जमाफीची अंमलबजावणी अपूर्ण आहे, आणि सिंचनाच्या नावाखाली जलयुक्त शिवारासारख्या योजनांचे फक्त उद्घाटन झालेत.

यामुळे अशा राजकीय विधानांचा खऱ्या शेतकऱ्याच्या जीवनावर प्रत्यक्ष परिणाम शून्य असतो, आणि उलटपक्षी निराशा, उद्रेक आणि स्थलांतरासारखे गंभीर प्रश्न अधिक खोलवर जातात.

**स्थायिक शेतीचा अभावः**

सिंचनाच्या कमतरतेमुळे अनेक शेतकरी पारंपरिक शेतीकडे परतले नाहीत. शेतीतील अनिश्चिततेमुळे ग्रामीण भागातील तरुण शहरांकडे स्थलांतर करतात, ज्याचा परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतो आहे.

**सरकारने पुढील दिशा ठरवली पाहिजे**

१. शपथपत्रांच्या सत्यतेवर पुनर्विचार होणे आवश्यक, त्यासाठी केवळ कागद नव्हे तर प्रत्यक्ष सर्वेक्षण आवश्यक केले पाहिजे.
२. विदर्भातील सिंचन योजनांचे ऑडिट करण्यासाठी स्वतंत्र समितीची नियुक्ती केली पाहिजे.
३. ठिबक सिंचन, जलसंवर्धन, लघु सिंचन प्रकल्प यावर स्वतंत्र व ठोस योजना केली पाहिजे.
४. विदर्भ विकास केंद्रस्थानी ठेवण्याकरिता राजकीय इच्छाशक्ती आवश्यक गरज आहे.

एकंदरीत अमरावती आणि वाशिम जिल्ह्याचे वास्तव जर तपासलं तरअनुशेष संपला, हा दावा केवळ कागदावर लागू होतो. प्रत्यक्षात विदर्भातील शेतकऱ्याला आजही पाण्यासाठी आकाशाकडे बघावे लागते. आत्महत्या, स्थलांतर, दुष्काळ यांचे संकट अद्यापही विदर्भाच्या छायेत आहे.

प्रा. बी. टी. देशमुख यांच्यासारख्या अभ्यासकांची निरीक्षणे शासनाच्या डोळ्यांवरची झापडं काढणारी ठरावी. सरकारने आकड्यांची कसरत न करता प्रत्यक्षात पाण्याचा प्रवाह निर्माण करणाऱ्या योजना आखाव्यात. तेव्हाच खऱ्या अर्थाने अनुशेष संपल्याची भावना विदर्भात निर्माण होईल.



प्रा. डॉ. प्रशांत विघे
राज्यशास्त्र विषयाचे लेखक
भारतीय महाविद्यालय,
अमरावती.
९३२६८७७७४९

# श्रध्दा व निष्ठा वृध्दिंगतासाठी वर्षावास!

*चरथ भिक्खवे चारिकं,*
*बहुजन हिताय,*
*बहुजन सुखाय,*
*लोकानुकम्पाय,*
*अत्थाय हिताय देवमनुस्सानं ।*
*देसेथ भिक्खवे धम्मं,*
*अदिकल्याणं मज्झकल्याणं,*
*परियोसानकल्याण, सात्थ सब्यञ्जनं*
*ब्रम्हचरियं पकासेथ ॥*

तथागतांनी धम्म प्रचार व प्रसारासाठी भिक्खूंना आदेश दिला. भिख्खूहो, बहुजनांच्या हितासाठी, सुखासाठी, लोकांवर अनुकंपा करण्यासाठी, मानवांना कल्याणकारी, धम्मपदेश करण्यात तुम्ही प्रवृत्त व्हा,

प्रारंभी कल्याणपद, मध्यंतरी कल्याणपद आणि शेवटीही कल्याणपद अशा या धम्म मार्गाचा लोकांना उपदेश करा.

वर्षावास म्हणजे पावसाळ्यातील निवास आषाढी पौर्णिमेपासून आश्विन पौर्णिमेपर्यंत, या तीन महिन्यात फक्त बुद्ध विहारात जीवन व्यतीत करणे.

या काळात भिक्खूंनी धम्म-प्रचार-प्रसारासाठी स्वतःला तयार करणे, बौध्द उपासक/उपासिकांना धम्माचं महत्व सांगणे, ध्यान-साधना करणे, धम्मदान स्विकारणे आदि नित्यक्रम करावे असा आदेश तथागतांनी भिक्षूसंघास दिला. त्याप्रमाणे ते आचरण करीत असत. यालाच वर्षावास म्हणण्याची प्रथा सुरु झाली, ती आजतागायत अविरत सुरु आहे यात खंड नाही. इथेच वर्षावासाचं महत्व सर्वश्रुत आहे.

तथागतांनी बुद्धत्व प्राप्तीनंतर पंचवर्गीय संन्याशांना आपला अष्टांगिक मार्ग, प्रतीत्य समुत्पाद, चार आर्यसत्य हे समजावून दिल्यानंतर त्यांना ते कळले. इसिपतन वन (आधुनिक सारनाथ), वाराणसी येथे अनुत्तर असे पहिले धम्मचक्र प्रवर्तन केले. आश्विन पौर्णिमेला एकसष्ठ अर्हत भिक्षुंच्या समवेत धम्मचक्राची घोषणा केली. चारही दिशांना जाऊन बहुजन हिताय - बहुजन सुखाय धम्माची अशी सिंहगर्जना केली.

तथागत बुध्दांची पहिली धम्मसभा आषाढी पौर्णिमेला झाली. पुढे भिख्खूसंघाच्या निर्मितीनंतर दरवर्षी याच कालावधीत उपासक वषार्वास करतात. याची सुरुवात आषाढी पौर्णिमेला होते आणि याच काळात पंढरीची वारी ही सुरु होते, हे निव्वळ योगायोग नाही.

भगवान बुद्धाच्या काळात बुद्धांनी सर्व भिक्षूंना धम्माचा प्रसार करण्याचे आदेश दिले आणि सर्व बौद्ध भिख्खू या कामात गुंतले होते, परंतु असे केल्याने त्यांना बऱ्याच संकटांना आणि विशेषतः पावसाळ्यात नद्यांमध्ये अनेक संकटांना सामोरे जावे लागे.

पुरामुळे बौद्ध भिख्खू वाहून जात आणि त्यांच्या चालण्याने शेतातील पिकांचे नुकसान होत त्यांनी हे तथागतांना सांगितले, बुद्धांनी आदेश दिला की आषाढ पौर्णिमेपासून ते अश्विनी पौर्णिमेपर्यंत सर्व भिक्षूंनी एकाच ठिकाणी रहावे, भिक्षेसाठी गावात जाऊ नये.



एकाच ठिकाणी राहून धम्माचे पठण अध्ययन करावे. जर गरज पडली तर भिक्षू आपल्या गुरूंकडून जास्तीत जास्त एका आठवड्याचा वेळ घेऊन विहारातून बाहेर जाऊ शकतात,

भगवान बुद्ध काळापासून वषार्वास अस्तित्वात आहे.

तथागतांनी ४५ वर्षावास श्रावस्ती, जेतवन, वैशाली, राजगृह इत्यादी ठिकाणी केले. अशा प्राचीन गुरू-शिष्य परंपरेचे पालन आजही भारतात आणि बौद्धराष्ट्र थायलंड, म्यानमार, श्रीलंका, कंबोडिया आणि बांगलादेश पालन करतात.

आषाढ पौर्णिमेला वर्षावास सुरू होतो आणि अश्विन पौर्णिमेला संपन्न होतो, बौध्द धम्मात वषार्वासाला अनन्य साधारण महत्व आहे, सर्व बौध्द उपासक उपासिकांनी या तीन महिन्याच्या कालावधीत स्वःताच्या घरी रोज बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या बुध्द आणि त्यांचा धम्म या पुस्तकाचे किंवा अन्य बुद्ध धम्माशी संबंधित पुस्तकाचे रोज सामुहिक वाचन करून त्यावर मनन चिंतन करावे व त्याचे आपल्या जिवनात अनुकरण केले पाहिजे,

नियमितपणे शेजारच्या बुध्दविहारात जावून धम्म श्रवण करावा व धम्ममार्गावर आरूढ व्हावे, धम्मदान द्यावे, उपोसथ व्रत घेऊन अष्टशिलाचे पालन करून सद्गुणाचा पाया मजबूत करावा, आपल्याप्रमाणे प्रत्येक कुटुंबास यानुसार आचरण करण्यास प्रोत्साहित केल्यास बौध्द उपासकांचा मोठा संघ तयार होईल व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिलेल्या प्रबुध्द भारताचे दिव्य स्वप्न साकार होण्यास हातभार लागेल.

बुद्धांनी शिकवले की उपोसथ दिवस म्हणजे अशुद्ध मनाची शुद्धता करण्याचा दिवस होय, उपोसथ किंवा उपोस्थ या शब्दाचा अर्थ उप+स्था म्हणजे एकत्र बसणे होय,

भिक्षुसंघाची एकसंघपणा टिकवून राहण्यासाठी उपोसथ विधी खूप महत्त्वाचा मानला गेला. उपोसथ विधी बुद्ध काळापासून अस्तित्वात आहे आणि बौद्ध देशांमध्ये उपोसथ विधी श्रद्धापूर्वक पाळला जातो.

अमावस्या आणि पौर्णिमेच्या दिवशी भिख्खू पटिमोक्खा (आचारसंहितेचे नियम) यांचे पाक्षिक कबुलीजबाब आणि पाठ होते. या दिवशी बौद्ध उपासक आणि भन्ते धम्म अध्ययन आणि ध्यानाची तीव्रता आणखीन वाढवतात.

विनयासंबधी जर आचारात काही दोष आला असेल तर उपोसथ दिनी भन्ते सर्वांसमोर कबुलीजबाब देत असत व संघ नियमानुसार त्यांना पुढील कारवाईस समोर जावे लागत. हा विधी खूप पवित्र मानला जाई, आजही त्याचे पालन केले जाते.

धम्माप्रती वचनबद्ध उपासक गृहस्थ पंचशील, दहा परिमिता, अष्टांगिक मागार्चे पालन करतात धम्म आचरणात उत्साह जागृत होण्याकरिता समाधी मागार्चे, ध्यानाचे अवलंबन करतात. जेव्हा शक्य असेल तेव्हा उपासक या दिवसाचा उपयोग स्थानिक विहारात जाण्याची संधी म्हणून करतात.

या दिनी संघाला विशेष दान अर्पण केले जाते, धम्म प्रवचन ऐकले जाते आणि रात्री उशिरापर्यंत धम्म बांधवा सोबत ध्यान-धारणा केली जाते. जे उपासक विहारात जाऊ शकत नाहीत अशांना ही उपोसथ दिन संधी देतो कि, आपले ध्यान करण्याचे प्रयत्न वाढवावे कारण या पवित्र दिनी जगातील हजारो उपासक ध्यान धारणेचा अभ्यासात वुद्धी होण्याच्या दिशेने पाऊल टाकतात.

तथागत बुद्धांच्या आदेशानुसार भिक्खुसंघ धम्म प्रचारासाठी सर्व ऋतूत चारही दिशांना पायी फिरत असत, या तिन्ही ऋतुत त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागत असे, नैसर्गिक संकटांचा सामना करून प्रतिकूल परिस्थितीतही ते धम्माचा प्रचार-प्रसार करीत असत.

हे सर्व लक्षात घेऊन तथागत बुद्धांनी भिख्खू संघाला आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या कालावधीत, एकाच ठिकाणी विहारात राहून धम्माचा अधिक अभ्यास करीत आसपासच्या परिसरातील उपासकांना धम्मज्ञान देण्याबाबत सूचना दिल्या, आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा हा काळ वषार्वास म्हणुन तेव्हापासुन संपन्न होऊ लागला . (वर्षावास म्हणजे पावसाळ्यातील निवास)

वर्षावास काळात श्रध्दावान उपासक विहारात जावून धम्म-श्रवण करतात, विहारात भिख्खूंना श्रध्दाभावनेने भोजनदान करतात व आजही सातत्याने सुरु असतात. फार महत्व आहे या पोर्णिमेचे. आपण आपली संस्कृती जपली पाहिजे. आषाढ पौर्णिमेच्या अर्थात गुरु पौर्णिमेच्या सर्व उपासक/उपासिकांना मंगलमय शुभेच्छा!



■ प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

# दुर्घटनांनंतर सत्ताधारी जबाबदारी का झटकून देतात?

१९९६ मध्ये दोन विमानांची हवेत टक्कर झाल्यानंतरदेशातील सर्वात मोठ्या विमान अपघातात किमान २८० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला. सरकारच्या दोन वरिष्ठ नेत्यांचे गृहराज्य असलेल्या गुजरातमधील अहमदाबाद येथे गेल्याच महिन्यात एअर इंडियाचे विमान कोसळले. अपघाताच्या कारणाबद्दल अंदाज बांधणे अद्याप खूप लवकर आहे, परंतु त्यामुळे देशात हवाई सुरक्षेवर निश्चितच वाद निर्माण झाला आहे.



अधिकृत आकडेवारी दर्शवते की या क्षेत्रातील भारताचा सुरक्षा ट्रॅक रेकॉर्ड जागतिक मानकांच्या बरोबरीचा आहे तरीही चिंतेची पुरेशी कारणे आहेत. टाटा समूहाच्या एअर इंडियाचे व्यवस्थापन अजूनही या वस्तुस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करत आहे की, जुनी विमान कंपनी चालवणे हे स्टील किंवा इतर कोणत्याही ग्राहक व्यवसायासारखे नाही.

जगातील सर्वात मोठी एअरोस्पेस कंपनी बोइंग स्वतःच चौकशीच्या अधीन आहे. वाढत्या विमान वाहतूक क्षेत्रावरील नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या देखरेखीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाईल. अहमदाबाद विमानतळाचे व्यवस्थापन आणि संचालन करणाऱ्या अदानी समूहालाही उत्तर द्यावे लागेल.

हे चालतेच" या वृत्तीने सुरक्षा मानकांकडे कोण लक्ष देते...? प्रत्येक दुर्घटनेचा एक नमुना असतो. चलता है" या वृत्तीने सुरक्षा मानकांकडे कमी लक्ष दिले जाते. राजकीय दिखाव्याला प्राधान्य दिले जाते. वेगवान रेल्वेगाड्या, जास्त विमानतळ, खूप पर्यटनस्थळे, अनेक कार्यक्रम, परंतु व्यवस्था कमकुवत.



मार्चमध्ये मंत्रालयावरील संसदीय स्थायी समितीच्या अहवालात म्हटले आहे की नागरी विमान वाहतूक महासंचालनालयातील मंजूर पदांपैकी ५३% पदे रिक्त आहेत, तर विभागाच्या सुरक्षा ब्युरोमध्ये रिक्त पदांचा दर ३५% आहे. महत्त्वाकांक्षी उडान" योजनेचे उद्दिष्ट १२० नवीन गंतव्यस्थाने जोडण्याचे आहे, परंतु त्याचे बजेट ३२% ने कमी करण्यात आले आहे.

गेल्या दशकात देशातील विमानतळांची संख्या जवळजवळ दुप्पट झाली असली तरी सुरक्षा मानके राखण्यासाठी खर्च केला जाणारा निधी खूपच कमी आहे. विमान अपघातामुळे जमिनीवर काही फरक पडेल का? ब्लॅक बॉक्स आणि फ्लाइट डेटा रेकॉर्डर विमान उड्डाणानंतर काही सेकंदात आगीच्या गोळ्यात का बदलले? याबद्दल अधिक संकेत देऊ शकतात. पण शक्तिशाली भागधारकांचा सहभाग असूनही सत्यापर्यंत पोहोचण्यासाठी तपास पुरेसा निःपक्ष आणि पारदर्शक असेल का?

आणखी एक प्रश्न उद्भवतो तो म्हणजे आपल्या व्यवस्थेत महत्त्वाच्या व्यक्तींवर वेळेवर जबाबदारी निश्चित करण्याची काही जबाबदारी आहे का? जून महिन्यातच घडलेल्या अपघातांच्या मालिकेवर एक नजर टाका.

**४ जून** : आरसीबीच्या विजयाच्या उत्सवादरम्यान बंगळुरूमध्ये चेंगराचेंगरी झाली, ज्यामध्ये ११ लोकांचा मृत्यू झाला. पोलिसांनी आवश्यक परवानगी न देताही हा कार्यक्रम घाईघाईने आयोजित करण्यात आला होता. विधान सौधा आणि चिन्नास्वामी स्टेडियममध्ये सलग दोन कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याने गर्दीने पोलिस भांबावून गेले.

खासगीरीत्या चालवल्या जाणाऱ्या फ्रँचायझीच्या विजयाच्या सार्वजनिक प्रदर्शनाला सार्वजनिक सुरक्षेच्या तातडीच्या गरजेपेक्षा प्राधान्य दिले. जबाबदारी स्वीकारण्याऐवजी कर्नाटकातील गटबाजीने ग्रस्त काँग्रेस सरकारने आपली चूक टाळली. बंगळुरूच्या उच्च पोलिस अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आले, तर स्टार खेळाडूंसोबत फोटो काढणाऱ्या राजकारण्यांपैकी कोणालाही जबाबदार धरण्यात आले नाही.

**९ जून** : मुंबईजवळील मुंब्रा येथे झालेल्या रेल्वे अपघातात चार जणांचा मृत्यू झाला. गर्दीच्या गाड्यांच्या फूटबोर्डवर उभे राहून प्रवासी रुळांवर पडले. मुंब्रा ट्रॅकवरील तीव्र वळणामुळे ते आणखी धोकादायक बनले. मध्य रेल्वेची एक समिती या घटनेची चौकशी करत असताना मुंबईसारख्या महानगरातील अराजक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेकडे कोणतेही लक्ष दिले गेले नाही. उपनगरीय रेल्वे व्यवस्था दुर्लक्षित आहे का?

**१६ जून** : मुसळधार पावसात जास्त गर्दीमुळे पुण्याजवळील एक पूल कोसळला, त्यात चार जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले. ३० वर्षे जुना हा पूल असुरक्षित" मानला जात होता, परंतु स्थानिकांच्या वर्षानुवर्षे तक्रारी असूनही नवीन पुलाच्या कामाचा आदेश उशिरा देण्यात आला आणि कोसळण्याच्या फक्त पाच दिवस आधी जारी करण्यात आला.

**१५ जून** : केदारनाथ मंदिरा पासून उत्तराखंडमधील गुप्तकाशीला जाणारे हेलिकॉप्टर जंगलात कोसळल्याने सात जणांचा मृत्यू झाला. चिंताजनक बाब म्हणजे गेल्या सहा आठवड्यांत या प्रदेशात घडलेली ही पाचवी घटना होती, ज्यामुळे पर्वतीय भागातील खराब हवामानात हेलिकॉप्टर सेवेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मुख्यमंत्र्यांनी मानक कार्यप्रणाली लागू करण्याचे आश्वासन दिले आहे, तर डीजीसीएने अतिरिक्त देखरेखीचे आश्वासन दिले आहे. पण पुन्हा एकदा हे खूप कमी उशिराचे प्रकरण आहे. जर जबाबदारी झटकण्यासाठी ऑलिम्पिक झाले असते तर आपल्या राज्यकर्त्यांनी सुवर्णपदक जिंकले असते!

पुनश्चः काही दिवसांपूर्वी, बीबीसीच्या एका तपास अहवालात ही घटना उघडकीस आली होती. या वर्षी जानेवारीमध्ये महाकुंभात झालेल्या चेंगराचेंगरीचे सत्य उघड झाले. उत्तर प्रदेश सरकारने ३७ जणांचा मृत्यू झाल्याचा दावा केला होता, तर बीबीसीच्या तपासात ही संख्या किमान ८२ असल्याचे आढळून आले. जर आपण मृतांबद्दल खोटे बोललो तर आपल्याला मानवी जीवनाचे मूल्य समजते का?

■ ■ ■

# सदगुरूंचे नाम हेच वेदशास्त्र : जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज

## वेरूळ येथील गुरुपौर्णिमा सोहळ्यात अलोट जनसागर





**नाशिक ।** "सदगुरूंचे नाम मात्र, तेच आम्हा वेद शास्त्र, सकळा मंत्र वरिष्ठ मंत्र, नाम सर्वत्र गुरूंचे" या एकनाथी भागवतातील एकाच ओवीतून सदगुरुंच्या नामाला किती मोठे महत्व आहे हे लक्षात येईल. म्हणूनच सदगुरूंच्या नामाचा आणि सदगुरूंच्या कामाचा कधीही विसर पडू देऊ नका. आजच्या युगात पैसा आणि जमीनदार व्यक्तीला वैभवशाली समजले जाते. मात्र बाबाजींचे जपानुष्ठान करणारे साधक हेच खरे माझे वैभव आहे. कारण आपुलिया हिता असे जो जागता धन्य माता पिता तयाची या. श्रमदान, अनुष्ठान, गोसेवा, कृषी_ऋषी सेवा, गुरुकुल या जगदगुरु जनार्दन स्वामी महाराजांच्या अर्थातच बाबाजींच्या या परंपरा समाजासाठी वरदानकारी आहेत, असे प्रतिपादन अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतीगिरीजी मौनगिरीजी महाराज यांनी केले.

जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने श्रीक्षेत्र वेरूळ येथे आठवडाभर वार्षिक गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या सप्ताहात विद्यार्थी संस्कार शिबिर, जपानुष्ठान, उपनयन संस्कार, प्रवचन, सत्संग, हस्तलिखित नामजप साधना यांसह भरगच्च कार्यक्रम संपन्न झाले. या संपूर्ण सोहळ्याची सांगता आणि गुरुपौर्णिमा महोत्सव मोठ्या भक्तिपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी उपस्थित विराट जनसमुदायास धर्मउपदेश करतांना जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी मौनगिरीजी महाराज बोलत होते. ते पुढे म्हणाले की, भारतीय संस्कृतीत गुरू-शिष्याचे अतूट नाते आहे. जीवनातील अंधकार दूर करायचा असेल तर सदगुरूंना शरण येऊन त्यांच्या आज्ञेचे पालन करावे. सदगुरू नामात मोठे सामर्थ्य आहे .ज्यांच्या मुखात सदगुरूंचे नामस्मरण असेल त्यांना प्रत्यक्ष काळही काही करू शकणार नाही. मात्र आवडीने भावाने नाम घ्यावे. जो सदगुरूंची निष्काम भावनेने सेवा करेल त्याच्या पायी मोक्ष देखील लोटांगण घेईल. भागवतातील या ओवीचा अर्थ समजेल त्याच्या साठी आहे. प्रत्येकामध्ये भगवंताचा वास आहे. त्यामुळे सर्वांशी प्रेमाने, नम्रतेने, आदराने वागा, सतत नामस्मरणात आणि कामात रहा, व्यसनापासून दूर रहा. सर्वांमध्ये वंदनीय रहाल असेच कार्य करा. गुरु सेवेतच आनंदाची प्राप्ती आहे. तन, मन, धन सदगुरूंना अर्पण करा. श्रमदान परंपरेचा लाभ घ्या.जो करेल श्रमदान त्यासी घडेल चारी धाम, असेही परमपूज्य जगदगुरु बाबाजींचे वचन आहे. असेही शांतिगिरीजी महाराज यांनी सांगितले.

गुरुपौर्णिमा महोसवाचा प्रारंभ पहाटे ब्रम्हमुहूर्तावर करण्यात आला. पहाटे ४ वाजता संकल्पित समाधी मंदिरातील श्री बाबाजींच्या श्री मूर्तीचा व जागृत देवस्थान श्री सिद्धेश्वर महादेवाचा महाअभिषेक वेदशास्त्र संपन्न पंडित विलासशास्त्री कुलकर्णी गुरुजी यांच्या मंत्रोच्चारात संपन्न झाला. पहाटे ५ वाजता नित्यनियम विधी, ध्यान, प्राणायाम, भागवत वाचन, प्रवचन, सत्संग आदी कार्यक्रम संपन्न झाले. यानंतर हजारो भाविकांनी श्रमदान करून आश्रमातील शेती व परिसराची स्वच्छता केली. चांदीच्या रथासह जगदगुरु जनार्दन स्वामी महाराजांच्या पालखीची लक्षवेधी मिरवणुक संपन्न झाली. यानंतर गुरुपौर्णिमेच्या मुख्य सोहळ्यास प्रारंभ झाला. वेदशास्त्र संपन्न पंडित कमलाकरशास्त्री पैठणकर गुरुजी यांच्या मंत्रघोषामध्ये जगदगुरूंच्या श्री पादुकांचे पाद्य पूजन उत्तराधिकारी जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज आणि श्रीबाबाजी परंपरेतील संत १०८ महंत स्वामी सेवागिरीजी महाराज, स्वामी लक्ष्मणगिरीजी (दादा) महाराज यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी भस्म स्नान करुन आपल्या असीम त्यागाची प्रचिती दिली.भस्म स्नानाचा हा सोहळा आकर्षणाचे केंद्र ठरला. परमपूज्य जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी भजनात नाचून गाऊन भाविकांचा उत्साह वाढवला. यावेळी भाविकांच्या वतीने महाराजांची तुला करण्यात आली. राज्यभरातील विविध आश्रमातील १०८ चरण पादुकांचे विधिवत पाद्य पूजन संपन्न झाले. संत, अतिथी व ब्रम्हवृंद यांचेही पूजन यावेळी करण्यात आले. भक्तिगीतांच्या ठेक्यात आमदार दिलीप बनकर यांच्यासह उपस्थित भाविकांनी नाचून गाऊन आंदोत्सव साजरा केला. गुरुपौर्णिमेच्या या भव्य दिव्य सोहळ्यास राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, वैदकीय, सांस्कृतिक आशा विविध क्षेत्रातील मान्यवरांसह आश्रमीय संत, ब्रह्मचारी साधक व राज्यभरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आश्रमशाळा शिरसगाव, मुरंबी येथे रानभाज्या महोत्सवाचे आयोजन



**हरसूल ।** त्र्यम्बक तालुक्यात नुकताच शासकीय माध्यमिक आश्रमशाळा शिरसगाव व मुरंबी यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्याध्यापक दिपक भास्कर व मुख्याध्यापिका शितल खंडे यांच्या मार्गदर्शनाखाली रानभाज्या महोत्सव व आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

रानभाज्या महोत्सवाचे उद्घाटन शिरसगाव येथील सरपंच भागिरथी महाले यांनी करुन त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते विर बिररसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन रानभाज्या महोत्सव व आनंद मेळाव्याची सुरुवात करण्यात आली. शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व पालक यांनी विविध प्रकाराच्या रानभाज्या बनवून रानभाज्या महोत्सवात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या महोत्सवात प्रत्येक वर्गातील विद्यार्थी व शिक्षक तसेच पालक यांच्याकडुन वेगवेगळ्या प्रकारचे रानभाज्याचे स्टॉल लावण्यात आले होते. या रानभाज्या महोत्सवात अंबाडी, तेरा, वास्ता, माटाची भाजी पेढराची भाजी खुरसणीची भाजी तांदुळाची भाजी,जिरा भाजी कवदर भाजी, मोहठ्याची भाजी तेराची पातवड, लोतीची भाजी, आक्राची भाजी भोकोरले, आंळिब,कुळीदाचे बेसन,उदिडदाळीचे पदार्थ नागली,तांदूळ,व बाजरीची भाकरी, असे या भागातील विविध प्रकाराच्या रानभाज्या आणि पदार्थ बनवून विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी या पदार्थांची चव घेऊन आनंद लुटला. या महोत्सवाच्या निमित्ताने माध्यमिक शिक्षक सिद्धार्थ भोगले व प्राथमिक शिक्षक दौलत लहारे यांनी या भागातील वनामध्ये पावसाळ्यात उपलब्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या रानभाज्या व त्यांचे आहारातील महत्त्व पटवून सांगितले.

या रानभाज्या महोत्सवा प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते हिरामण भाऊ महाले, अधिक्षिका पुणम बावणे, अधिक्षक प्रभाकर शिंदे,अरुण बागले, माध्यमिक शिक्षिका सिता भोये,माध्यमिक शिक्षक श्रीराज अथीलकर, प.प्रा शिक्षक संदिप रुपणर , सुहास डोंगरे , प्राथमिक शिक्षक अमोल कोपरेकर, सुभाष अस्वले, कनिष्ठ लिपिक कृष्णा बाजकर, किरण राऊत, शिक्षकेत्तर कर्मचारी किसन टबाले, मनोहर जाधव व शाळेतील विद्यार्थ्यी पालक, शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्री मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## खर्डे दत्त मंदिरात गुरुपौर्णिमा साजरी

**देवळा ।** खर्डे येथील श्री गुरुदेव दत्त मंदिरात गुरुपौर्णिमा निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले . सकाळपासून मंदिरात गुरुवर्य वै वामनानंद महाराज यांच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. दुपारी भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले. सायंकाळी प्रवचन, हरिपाठ, रात्री हरी कीर्तन पार पडले. खर्डे पंचक्रोशीतील व तालुका तसेच नाशिक शहरासह जिल्हा भरातून वै वामनानंद महाराजांच्या शिष्यांनी दत्त मंदिरात हजेरी लावून दर्शनाचा लाभ घेतला. उत्तराधिकारी हभप पुंडलिक महाराज यांनी भाविकांना मार्गदर्शन केले.

# आर्ट ऑफ लिव्हिंग केंद्रातर्फे गुरुपौर्णिमा आनंदात साजरी




**नाशिक ।** गंगापूर रोड मॅरेथॉन चौक रावसाहेब थोरात सभागृहात आर्ट ऑफ लिव्हिंग परिवारातील सर्व साधकांनी एकत्रित गुरु पौर्णिमा महोत्सव मोठ्या आनंदात साजरा केला. गंगापूर रोड मॅरेथॉन चौक रावसाहेब थोरात सभागृहात साधकानी ध्यान, ज्ञान व गान यांचा अनुभव घेतला. नाशिक मधील प्रसिद्ध आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रसिद्ध गायक सारंग गोसावी त्यांच्या सुमधुर भावगीते भक्तिगीते भजनात सर्वजण तल्लीन झाले होते.

कार्यक्रमाचे नियोजन आर्ट ऑफ लिव्हिंगचे एसएसआरडीपीचे ट्रस्टी विजय हाके, महाराष्ट्र अपेकसचे मेंबर डॉ. उमेश मराठे, एडवोकेट बिपिन शिंगाडा, संजय बडवर, टीचर कॉर्डिनेटर माधुरीताई पवार व इतर सर्व सहकारी प्रशिक्षक अर्जुन गोटे, खंडू गांगुर्डे, देवनानी अंकल, निवृत्ती काकड, अमृतकर, अनंत खळेकर, संजय मेचकुल, नाशिक आयुष्याचे प्रवीण कापडणे व सर्व स्वयंसेवक यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. श्री श्री रविशंकर यांच्या स्वप्नपूर्तीसाठी समाजामध्ये शांतता प्रेम वाढवून तणाव मुक्त व सुखी आनंदी जीवनासाठी ऑगस्टमध्ये येणाऱ्या आनंदोत्सव कार्यक्रमासाठी सर्व नाशिककरांना सहभागी करून घेण्याचा सुदर्शन क्रिया लाभ देण्यासाठीचा संकल्प व आवाहन बिपिनभाई शिंगाडा यांनी केले. यावेळी रक्तदानाचे महत्व सांगून डॉ. उमेश मराठे यांनी रक्तदान करण्यास उपस्थितांना प्रोत्साहित केले. श्री श्री रविशंकर यांच्या भारतातील नव्हे तर जगभरातील कार्यसंबंधी लक्ष वेधून व तो आदर्श समोर ठेवून आपणं सर्वांनी राष्ट्रासाठी समाजासाठी आपल्या क्षमतेने सेवा देण्याचे आवाहन डॉ. मराठे यांनी या प्रसंगी केले.

## महत्त्वाचे

### वनिता विकास मंडळ प्रशालेत गुरुपौर्णिमा

**नाशिक रोड ।** येथील वनिता विकास मंडळ. संचलित, प्राथमिक विनय मंदिर प्रशालेत व्यासपौर्णिमा म्हणजेच गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. प्रथमतः गुरु दत्तात्रय प्रभूंच्या प्रतिमेचे पूजन करून आरती करण्यात आली.या वेळी इ. ४ थी. च्या विद्यार्थिनींनी गीत सादर केले.त्यानंतर इयत्ता पहिली ते इयत्ता चौथी च्या विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेबद्दल माहिती दिली. प्रशालेतील उपशिक्षिका सौ. मनिषा मानधने मॅडम व उपशिक्षक श्री स्वप्निल सुर्यवंशी यांनी जीवनातील गुरूंचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी सर्व शिक्षक - शिक्षकेतर वृंद यांना भेटकार्ड देऊन गुरुविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. हे भेटकार्ड इ. ४ थी. अ व ब च्या विद्यार्थ्यांनी तयार केले होते. त्यांना वर्गशिक्षक सौ.सोनाली बागुल मॅडम व स्वप्निल सुर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले होते.

### मराठा हायस्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या मराठा हायस्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात होते. व्यासपीठावर पर्यवेक्षक रामनाथ गडाख, देविदास भारती व नंदा जाधव उपस्थित होते. व्यासपूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सोहम शिंदे व सोहम मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. तर जान्हवी सोनजे, दर्शिका



माळी, समृद्धी आहेर, सोहम वाघ, आर्यन नागपूरकर या विद्यार्थ्यांनी एका सुंदर नाटिकेचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाप्रसंगी सर्व शिक्षक बंधू भगिनी यांना भेटकार्ड, गुलाबपुष्प व पेन देऊन सन्मानित करण्यात आले. संगीतशिक्षक दिनकर दांडेकर व गीत मंचाने सुंदर गीताचेदेखील सादरीकरण केले. मुख्याध्यापक थोरात यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. भावना पाटील व स्वरा उशीर यांनी सूत्रसंचालन केले. अक्षदा कापडी व सई दिघे यांनी आभार मानले. कलाशिक्षक जगदीश डिंगे, केशव खताळे व वैभव पाटील यांनी सुंदर फलक लेखन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक बंधू भगिनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# नाशिक येथे रविवारी राष्ट्रीय कर परिषद 'ज्ञानदीप'

**नाशिक ।** नाशिक कर सल्लागार, चार्टर्ड अकाउंटंट, वकील, व व्यावसायिकांसाठी महत्त्वपूर्ण एक दिवसीय राष्ट्रीय कर परिषद ज्ञानदीप चे रविवार दि13 रोजी सकाळी 8ते सायंकाळी 5:30 या वेळेत गोविंद नगर येथील हॉटेल फोर पॉईंट्स येथे आयोजन करण्यात आले आहे. या कर परिषद मध्ये कर क्षेत्रातील नामवंत वक्ते ॲड.दिपक बापट,सीए संजय वनबट्टे,प्रकाश पटवर्धन आदी मार्गदर्शन करणार आहेत.या परिषदेमध्ये जीएसटी व आयकर क्षेत्रातील ताज्या बदल,नविन सुधारणा,केस स्टडीज व व्यावसायिक दृष्टीकोनातून सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. या कर परिषेदेचे आयोजन नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोशिएशन, नाशिक टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोशिएशन, महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन,ऑल इंडिया फेडरेशन ऑफ टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन, जीएसटी प्रॅक्टिशनर्स ऑफ महाराष्ट्र या राष्ट्रीय संस्थांनी केले आहे. परिषेदेचे अध्यक्षपदी नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोशिएशनचे संस्थापक, अध्यक्ष अनिल चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे.या परिषदेस विविध संस्थांचे प्रमुख सचिन गांधी, संतोष गुप्ता,नितीन फिरोदिया,नितीन डोंगरे, महेश मडखोलकर,अनुरुद्र चव्हाण,नरेंद्र सोनवणे आदीच्या प्रमुख उपस्थिस्तीत होणार आहे.

या परिषेदेत जीवन गौरव पुरस्कार,नाशिक येथील सीए संजय मुथा यांना व युवा कर सल्लागार पुरस्कार नयन निराळी याना प्रदान करण्यात येणार आहे. परिषेद यशस्वी करण्या साठी प्रशांत उशीर,सुनील देशमुख, पंकज भामरे, प्रकाश विसपुते, नयन निराळी,चेतन पाटील, कमलेश सानप, सचिन येवलेकर आदी विशेष परिश्रम घेत आहे.

# पक्ष, नेता...ईथपर्यंत ठीक, कार्यकर्त्यांचे भविष्य काय?

**चंदन पवार**

कार्यकर्ता म्हटले की तो जिवापाड आपल्या पक्षावर आणि त्यापेक्षाही जास्त नेत्यावर प्रेम करणारा अवलिया... तो आपल्या नेत्यासाठी घरचे पैसे, स्वतःचा वेळ, ईमाने ईतबारे खर्च करीत असतो, घरात एक वेळचे अन्न नसले तरी तो त्याच्या टायर घासलेल्या गाडीत वीस रुपयाचे पेट्रोल टाकून साहेबांच्या दारावर जाऊन आज काही काम आहे का? कुठे जायचं आहे का साहेब...याची विचारणा करण्यासाठी जात असतो, असा मेहनती ईमानदार कार्यकर्ता साहेबाला आणि पक्षाला लाभतो, परंतु त्या कार्यकर्त्याला पक्षाकडून सोडाच परंतु त्या नेत्याकडून तरी त्याचा उध्दार केला जातो का? हा संशोधनाचा विषय झालेला आहे.

मी त्या कार्यकर्त्याची व्यथा नाही मांडत, जो साहेबांच्या एक फुटावर राहून आपली सर्व कामे बजावीत असतो आणि साहेबाला सुद्धा पैसे कमवून देतो व स्वतःही गब्बर होतो, मी त्या कार्यकर्त्याची व्यथा मांडतो आहे जो साहेबांच्या दहा फूट लांब असतो तरीही साहेबांसाठी तो जीव ओवाळून टाकण्यास तयार असतो.

आज प्रत्येक पक्षाकडे आणि पक्षातील गब्बर नेत्याकडे असे असंख्य कार्यकर्ते आहेत जे आपल्या परिवाराकडे, आपल्या छोट्याशा शेतीकडे, धंद्याकडे लक्ष न देता साहेबांच्या निवडणुकीत, साहेबांना माहीत नसताना त्यांच्यासाठी प्रचार करून दिवस रात्र हिंडत फिरत असतो, कधीकधी त्या कार्यकर्त्याला आपला घरचा डबा सुद्धा न्यावा लागतो म्हणजे घरची भाकरी खाऊन साहेबांची चाकरी करीत असतो, असे निष्ठावंत आणि ईमानदार कार्यकर्ते मी बघितले आहेत, अशा कार्यकर्त्यांचे ना साहेबाकडून कुठलेही काम होते, ना त्या कार्यकर्त्यासाठी साहेब आपली गॅरंटी देऊन बँक लोन करून देतात, ना त्यांच्या मुला मुलीचा शिक्षणाचा खर्च उचलतात किंवा त्याला व्यवसाय करण्यासाठी पैशांची मदत करतात, ना त्याच्यावर आलेल्या आर्थिक संकटावर फुंकर घालतात, हा... साहेब एक काम ईमानदारीने त्याच्यासाठी जरूर करतात ते म्हणजे त्याला प्रचारात कधी बोलवायचे हा फोन नक्कीच वेळेवर जातो, त्याचा वापर फक्त निवडणुकीपुरता आणि जिथे गर्दी जमवायची असते, मार खायचा असतो अशा ठिकाणी नक्कीच केला जातो, असे असताना देखील तो कार्यकर्ता त्या साहेबांनी कधीही न केलेल्या मदतीसाठी निवडणुकीच्या वेळेस आपले टाळके फोडायला सुद्धा तयार असतो, त्या स्वार्थी नेत्यांसाठी तो आपल्या मित्राशी, आपल्या नातेवाईकाशी सुद्धा दोन हात करायला किंवा अपशब्द बोलायला तयार असतो, हे सर्व करत असताना तो हे विसरतो की त्याचा नेता त्याच्या दुःखात कधीही त्याच्या पाठीशी उभा राहणार नसतो तरीही तो आपले सर्वस्व खर्च करीत असतो.




माझे सर्व कार्यकर्त्यांना कळकळीचे सांगणे आहे की आपण जर शेती करीत असाल एखादा छोटासा व्यवसाय करीत असाल तर तो ईमानदारीने आणि वेळ देऊन करा, त्यातून येणारा पैसाच तुमच्या संकटाच्या वेळेस कामी येणार आहे, ज्या नेत्यांसाठी तुम्ही जीव धोक्यात घालून रात्रंदिवस रक्ताचे पाणी करतात तो तुमच्या कामी येणार नाही याची मी खात्री देतो, जर तुम्हाला प्रयोग करायचाच असेल तर साहेबांकडे जाऊन फक्त पन्नास हजार रुपये मागा, त्यांना सांगा तुम्हाला ते पैसे मुलाच्या शिक्षणासाठी, मुलीच्या लग्नासाठी, व्यवसायासाठी किंवा हॉस्पिटलचे बिल भरण्यासाठी पाहिजे आहेत, त्या नेत्याने तुम्ही मागितलेले पन्नास हजार रुपये लगेच दिले तर त्यांचे नक्कीच आभार माना, कारण ज्याची खावी पोळी त्याची वाजावी टाळी, परंतु जर त्याने तुम्हाला पैसे दिले नाहीत तर तुमची किंमत त्यांच्या नजरेत किती आहे हे समजावायला ब्राह्मणाची आवश्यकता नाही, तुम्ही त्याच्यासाठी जे केले त्यांनी त्याची किंमत झिरो करून टाकलेली असते, जेव्हा तुमच्या घरावर संकट येते त्यावेळेस फक्त पैसाच कामी येतो मित्रांनो, तुमचा नेता नाही, ही खूनगाठ तुम्ही तुमच्या बुद्धीचा वापर करून बांधून घ्या, तुमचा योग्य निर्णय तुमच्या परिवारासाठी, तुमच्या मुलाबाळांसाठी त्यांच्या भविष्यासाठी महत्त्वाचा पैलू ठरणार आहे.

मी सर्व पक्षातील कार्यकर्त्यांना आवर्जून सांगेन, मित्रांनो... आपल्या संसाराकडे, मुलांकडे पत्नीकडे, आई-वडिलांकडे लक्ष द्या तेच तुमच्या दुःखात सहभागी होणार आहेत, किती वेळ परिवारासाठी, व्यवसायासाठी तुम्हाला द्यायचा आहे हे आजच ठरवून टाका, तरच तुमची आर्थिक प्रगती शक्य आहे, नाहीतर गड्या तू वीस चे टाक मी वीस चे टाकतो आणि रात्री एखाद्या बार वर बसतो, यातच तुमचे आयुष्य वाया जाणार आहे, तुमच्या चुकांची किंमत तुमच्या परिवाराला चुकवावी लागू शकते आणि तुमच्या मुलांचे व परिवाराचे भविष्य तुम्ही अंधारात ढकलत आहात याची पुसटशी जाणीव सुद्धा तुम्हाला होणार नाही, तो येणारा कर्दन काळ आजच ओळखा आणि कायमचे ठरवून टाका, मी साहेबांसाठी की माझ्या परिवारासाठी ? तुमच्यासारखे छोटे कार्यकर्ते त्यांच्याकडे असंख्य आहेत त्यांना फक्त तुमचा वापर करून तुम्हाला फडक्यासारखे फेकून द्यायचे आहे हे त्यांच्या डोक्यात असते त्यामुळे... सावध व्हा आणि निर्णय घ्या.

# संजय राऊत यांना मानहाणीची नोटीस

## संजय शिरसाट यांची माहिती



**छत्रपती संभाजीनगर :** राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांना मानहाणीची नोटीस बजावण्याचा इशारा दिला आहे. गत काही दिवसांपासून संजय राऊत मला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी माझी माफी मागितली नाही, तर मी त्यांना मानहाणीची नोटीस बजावेल. तसेच त्यांच्यावर गुन्हाही दाखल करेन, असे ते म्हणालेत. संजय राऊत यांनी स्वप्ना पाटकर यांच्याविषयी काय - काय बोलले होते, त्याचा व्हिडिओ पाहिला, तर आपल्याला त्यांची लायकी कळेल, असेही ते यावेळी म्हणाले. मंत्री संजय शिरसाट पुढे बोलताना म्हणाले की, संजय राऊत यांनी जर माफी मागितली नाही तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल. ते राज्यघटना मानत नाहीत. ते पुन्हा सांगतील अशा अनेक नोटीस आम्ही खिशात घेऊन फिरतो.

# राज्यातील प्रत्येक शेताला रस्त्यासाठी समग्र योजना आणणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## उपायोजनांसाठी समितीची स्थापना

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

प्रत्येक शेतकऱ्याच्या शेताला रस्ता देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. शेतात जाण्यासाठी, शेतमालाची ने-आण करण्यासाठी शेतरस्त्यांच्या निर्मितीसाठी विविध योजनांच्या निधीचा समन्वय साधून समग्र योजना शासन आणणार आहे. ही योजना संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांच्या शेत रस्त्यांची मागणी पूर्ण करणारी असेल, ही योजना समग्र असण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेचा उत्तरात केली.

शेतरस्त्यांच्या बाबत सदस्य अभिमन्यू पवार यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेमध्ये सदस्य सर्वश्री विजय वडेट्टीवार, सुमित वानखेडे यांनीही उपप्रश्न विचारत सहभाग घेतला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शेत रस्त्यांच्या समग्र योजनांबाबत गठीत समिती एक महिन्याच्या आत शासनाला उपाययोजनांचा अहवाल सादर करेल. शेत रस्ते करताना कौशल्यावर आधारित काम असल्यास यासंबंधी असलेल्या योजनांच्या समन्वयातून करणे, तसेच अन्य योजनांचा निधी एकत्रित करीत शेतरस्ते पूर्ण करण्याबाबत पडताळणी करण्यात येईल. गावांमधील रस्त्यांसाठी असलेल्या २५- १५ योजनेतील ५० टक्के निधी शेत रस्त्यांच्या निर्मितीसाठी उपयोगात आणण्याबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

या सूचनेच्या उत्तरात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शेत रस्त्यांच्या प्रकरणांमध्ये अपील उपविभागीय अधिकाऱ्यांपर्यंत संपवण्याची व्यवस्था निर्माण करण्यात येईल. वाटप पत्रात शेतकऱ्यांचा समावेश करणे, शेतरस्त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी लोक अदालती घेणे, रस्त्यांचे सपाटीकरण करणे, चालू वहिवाट रस्त्यांचे सर्वेक्षण, गाव नकाशात हे रस्ते घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. यापुढे शेतरस्ता कमीत कमी १२ फूट रुंदीचा करण्यात येईल. जमाबंदी आयुक्त यांच्या माध्यमातून शेत रस्त्यांना क्रमांक देण्याची कार्यवाही करण्यात येईल. शेतरस्ते निर्मितीबाबत रोजगार हमी योजना, ग्रामविकास व महसूल विभाग यांच्याशी चर्चा करून स्वतंत्र लेखा शीर्ष निर्माण करण्याबाबत पडताळणी करण्यात येईल. कालबद्ध कार्यक्रम राबवून शेत रस्ते पूर्ण करण्यात येतील, असेही महसूल मंत्री बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

# राज्यात पशुपालन व्यवसायाला कृषी व्यवसायाचा दर्जा : पंकजा मुंडे

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १२ :



पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात पशुपालन व्यवसायास कृषी व्यवसायाचा दर्जा देण्यात आला आहे. राज्यातील पशुपालन व्यवसायाला मोठा दिलासा देणारा हा निर्णय असून असा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली.

पशुसंवर्धन मंत्री मुंडे यांनी सांगितले, पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी हा क्रांतीकारी निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील सुमारे ७६.४१ लक्ष पशुपालक कुटुंबांना होईल. या निर्णयामुळे पशुजन्य उत्पादनातून सुमारे ७,७०० कोटी रुपये इतकी वाढ अभिप्रेत आहे.

मंत्री मुंडे यांनी सांगितले, या निर्णयानुसार राज्यातील वीज दर आकारणी, कृषी इतर या वर्गवारीनुसार न करता कृषी वर्गवारीप्रमाणे करण्यात येणार आहे. ग्रामपंचायत कर दरात एकसमानता आणण्याकरिता कृषी व्यवसायास ज्या दराने कर आकारणी केली जाते त्याच दराने कर आकारणी करण्यात येईल. पशुपालन व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या खेळत्या भागभांडवलासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जासाठी पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेच्या धर्तीवर व इतर प्रयोजनासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याज दरात ४ टक्के पर्यंत सवलत देण्यात येईल व त्यासाठी स्वयंस्पष्ट मार्गदर्शक तत्वे व कार्यपध्दती विहित करण्यात येईल आणि कृषी प्रमाणे कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास सवलत देण्यात येईल.

राज्याच्या सकल उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा १२ टक्के आहे. कृषी क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के आहे. राज्यातील पशुजन्य उत्पन्नाचा विचार करता भारतीय आरोग्य परिषदेने दैनंदिन आहारात शिफारस केलेल्या प्रमाणाइतके अंडी व मांस उपलब्ध नाही.

याशिवाय निती आयोगाच्या सन २०२१ च्या अहवालामध्ये पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये नियोजनपूर्वक व शास्त्रीय पद्धतीचे व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष होत असून त्यावर उपाययोजना करुन शेतकरी /पशुपालकांच्या आर्थिक जोखीम कमी करण्याची शिफारस केली असल्याचेही पशुसंवर्धन मंत्री मुंडे यांनी यावेळी सांगितले.

# लिपिक-टंकलेखक पदाच्या परीक्षेचा निकाल जाहीर होणार : आशिष शेलार



**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या लिपिक आणि टंकलेखक पदासाठी घेतलेल्या परीक्षेसंदर्भात दाखल झालेल्या याचिकेची सुनावणी मा. उच्च न्यायालयात ९ जुलै २०२५ रोजी घेण्यात आली आहे. मा. न्यायालयाने हा निकाल राखून ठेवला असून मा. उच्च न्यायालयाचा निर्णय प्राप्त होताच या परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर केला जाईल, असे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेत सांगितले. विधानसभा सदस्य हेमंत रासने यांनी या संदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली. या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात मंत्री ॲड. शेलार यांनी ही माहिती दिली. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे करिअर व हित लक्षात घेऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोग भरती परीक्षेत चांगले काम करत असल्याचे सांगत मंत्री ॲड. शेलार म्हणाले, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये मुलाखतीपर्यंत पात्र ठरलेल्या मात्र निवड न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी 'प्रतिभा सेतू' हा उपक्रम जाहीर केला आहे.

# गरिबांच्या हडप केलेल्या जागा त्यांना परत मिळवून देण्यासाठी मोहीम : चंद्रशेखर बावनकुळे



**मुंबई :** गरिबांच्या जागा धाकदपट करून, जबरदस्तीने किंवा आमिष दाखवून हडप केल्या जात असल्याच्या तक्रारी आहेत. संपूर्ण राज्यात अशा जागांची तपासणी करून गरिबांच्या हडप केलेल्या जमिनी त्यांना परत मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येईल, अशी घोषणा विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. या संदर्भात सदस्य असलम शेख यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य सर्वश्री योगेश सागर, अबू आझमी यांनीही सहभाग घेतला. प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, कल्याण तालुक्यातील मौजे गोळवली येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वारसदार यशवंत भीमराव आंबेडकर यांच्या जागेवर अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याची तक्रार प्राप्त झाली. या जागेवर ७२ सदनिका, ८ व्यावसायिक गाळ्यांचे बांधकाम करण्यात आले. याबाबत तत्कालीन संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. या इमारतीमध्ये सदनिका व गाळे घेणाऱ्या नागरिकांचा कुठलाही दोष नाही.

# शिळफाटा रस्त्यावर कोळे गाव येथे जलवाहिनी फुटून घरांमध्ये पाणी

■ महासागर प्रतिनिधी, कल्याण, दि. १२ :

कल्याण शिळफाटा रस्त्यावर काटई - बदलापूर रस्त्यावरील कोळे गाव हद्दीत समाधान हॉटेल भागात शुक्रवारी रात्री बारा वाजता एमआयडीसीची उच्च दाबाची जलवाहिनी फुटली. जलवाहिनीतून उच्च दाबाने शेकडो लीटर पाणी बाहेर फेकले गेल्याने हे पाणी जलवाहिनी परिसरातील कोळे गावांमधील घरांमध्ये घुसले.

बारवी धरणाकडून जांभूळ जलशुध्दीकरण केंद्रातून आलेल्या नवी मुंबई, ठाणे, मुंब्रा, कळवा, डोंबिवली परिसराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या काटई बदलापूर मार्गाने काटई कोळे गाव हद्दीतून शिळफाटा चौकमार्गे नवी मुंबई, मुंब्रा दिशेने टाकण्यात आल्या आहेत. या जलवाहिनीवरील कोळे गाव हद्दीतील समाधान हॉटेल भागातील जलवाहिनीच्या एका वाहिकेला पाण्याच्या अति उच्च दाब प्रवाहामुळे शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास गळती लागली. या गळतीचे प्रमाण वाढून जलवाहिनी वाहिका अति दाबामुळे फुटली. जलवाहिनीतील वेगवान प्रवाहाने वाहणारे पाणी मध्यरात्रीच्या सुमारास परिसरातील घरांमध्ये घुसले. या भागातील रस्ते जलमय झाले.

मुसळधार पावसामुळे महापूर येऊन घरात पाणी घुसले की काय या भीतीने घरात जमिनीवर झोपलेले रहिवासी जागे झाले. दरवाजा उघडल्यानंतर त्यांना घर परिसरातील रस्ते, बोळ जलमय झाल्याचे दिसले. मुसळधार पाऊस नसताना अचानक इतके पाणी आले कोठुन असे



प्रश्न कोळेगावातील रहिवाशांना पडले. कोळेगावातील बहुतांशी रहिवासी घरात पाणी घुसल्याने जागे झाले. त्यांनी विजेऱ्या घेऊन परिसरात पाहणी केली. त्यांना एमआयडीसीची काटई बदलापूर रस्त्यावरील कोळेगाव जवळील समाधान हॉटेलजवळील जलवाहिनी फुटली असल्याचे निदर्शनास आले.

ग्रामस्थांनी ही माहिती तात्काळ एमआयडीसीच्या वरिष्ठांना दिली. एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी तातडीने या जलवाहिनीतून जांभूळ उदंचन केंद्र (बारवी धरण) भागातून येणारा पाणी पुरवठा बंद केला. एमआयडीसीची जलवाहिनी दुरूस्त करणारे तांत्रिक पथक आणि एमआयडीसीचे स्थानिक अधिकारी मध्यरात्री घटनास्थळी दाखल झाले. फुटलेल्या जलवाहिनीतील पाण्याची पातळी कमी होताच, त्यांनी नादुरुस्त जलवाहिनीचा भाग काढून टाकला. त्या ठिकाणी नवीन भाग जोडून पहाटेपर्यंत या जलवाहिनीवरील पाणी पुरवठा पूर्ववत केला.

# धक्का लागल्याच्या वादातून हत्या

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १२ :

धक्का लागल्याच्या वादातून टोळक्याने एकाला दांडक्याने बेदम मारहाण करुन त्याचा खून केल्याची धक्कादायक घटना हडपसर-सासवड रस्त्यावरील ऊरळी देवाची परिसरात घडली. याप्रकरणी फुरसुंगी पोलिसांनी सहा जणांना अटक केली आहे. टोळक्याने केलेल्या मारहाणीत दोघे जण जखमी झाले असून, या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला होता.

रामलोचन हुसेनी कोरी (वय ४६, रा. उत्तरप्रदेश) असे खून झालेल्याचे नाव आहे. टोळक्याने केलेल्या मारहाणीत धीरज राम (वय २५) संतकुमार कोरी (वय २५, रा. ऊरूळी देवाची, हडपसर-सासवड रस्ता, फुरसंगी) हा जखमी झाला आहे. याप्रकरणी प्रेमलाल सुरतनाम कुमरे (वय २१), देवेस वसंत धुर्वे (वय २२), संजय पुल्स मसराम (वय २८), रणजीत प्रकाश जाधव (वय २०), सतीश भरत कुमरे (वय १८), विशाल मनाजी सरियाम (वय १८) यांना अटक करण्यात आली आहे. याबाबत संतकुमार कोरी (वय २५, सध्या रा. नारंग ट्रान्सपोर्ट, ऊरळी देवाची, हडपसर-सासवड रस्ता)

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतकुमार आणि रामलोचन हे मामा भाचे आहेत. रामलोचन, संतकुमार, धीरज हे मूळचे उत्तरप्रदेशातील आहेत. आरोपी हे मध्यप्रदेशातील आहेत. ऊरळी कांचन परिसरातील गोदामात ते हमाली करतात. आरोपीं आणि संतकुमार, रामलोचन यांच्यात एकमेकांकडे पाहण्यावरुन वाद झाला होता.

# बेशिस्त वागणारा माझा नातलग असला तरी त्याला टायरमध्ये घाला

## अजित पवारांची पोलिसांना सूचना



■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. १२ :

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बेशिस्त वर्तन करणाऱ्यांना निर्वाणीचा इशारा दिला आहे. बेशिस्त वागणारा माणूस कितीही मोठ्या बापाचा असला तरी मी पोलिसांना त्याला टायरमध्ये घेऊन झोडायला सांगणार आहे. नियम सर्वांसाठी समान आहेत. मग तो अजित पवार असो किवा अजित पवारांचा कुणी नातलग असो, असे ते म्हणालेत.

अजित पवार यांच्या हस्ते शनिवारी बारामती येथील सावित्री हॉस्पिटलचे उद्घाटन झाले. यावेळी बोलताना त्यांनी हुल्लडबाजी करणाऱ्यांना उपरोक्त शब्दांत इशारा दिला. ते म्हणाले, कधी कधी दुचाकीवाले इकडे-तिकडे पाहतात आणि हळूच रॉंग साईडने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करतात. असा माणूस सापडला तर तो मुलगा किंवा व्यक्ती कितीही मोठ्या बापाचा असला तरी, मी त्याला टायरमध्ये घेऊन झोडायला सांगणार आहे. त्याला त्याच्या 10 पिढ्या आठवल्या पाहिजेत. कुणीही अजिबात नियम तोडू नका. मग तो अजित पवार असो की अजित पवाराचा नातलग असो. सर्वांना नियम सारखा आहे.

अजित पवार पुढे म्हणाले, मी जे करतो ते बारामतीकरांसह सर्वांसाठी करतो. मी अनेक ठिकाणी झाडे लावली. पण तिथे कुणीपण येत आहे. जनावरे चरत आहेत. पण तसे चालणार नाही. जिथे माणसांना बसण्यासाठी जागा केली आहे, तिथे एक दुचाकीस्वार निवांत मांडी घालून लोकांसोबत गप्पा मारत होता. मी गाडी वळवली व पोलिसांना सांगितले की, याची गाडी ताब्यात घे आणि याला चांगला टायरमध्ये घाल. मग त्याने चुकले म्हणून विनवणी केली.

# ते दोघेही मुंबईच्या हिताचाच निर्णय घेतील



**मुंबई :** राज व उद्धव ठाकरे यांच्या विजयी मेळाव्यानंतर हे दोघे भाऊ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढतील असा दावा केला जात आहे. याविषयी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून सकारात्मक भूमिका घेतली जात आहे. तर राज या प्रकरणी सावध पाऊले टाकताना दिसून येत आहेत. पण आता भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केलेल्या एका विधानामुळे राज ठाकरे आपल्या भावाला हात दाखवत भाजपसोबत जाणार का? असा सवाल उपस्थित होत आहे. रवींद्र चव्हाण शनिवारी एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले की, राजकारणाक केव्हा काय होईल हे सांगता येत नाही.

ठाकरे बंधूंचा विजयी मेळावा झाला. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी राज ठाकरे यांनी स्टेटमेंट दिले होते की, कार्यकर्त्यांनी युतीच्या संदर्भात काहीही बोलू नये. चर्चा करू नये. त्यामुळे प्रत्येक पक्ष व प्रत्येक संघटना आगामी निवडणुकांच्या दिशेने अत्यंत सावधपणे पाऊले टाकत असल्याचे स्पष्ट होते. राज ठाकरे हे अतिशय समजदार आहेत. त्यांचे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामुळे हे दोघेही मुंबईच्या दृष्टिकोनातून जे जनतेचे हित आहे, त्यानुसारच पाऊले उचलतील. रवींद्र चव्हाण यांच्या या विधानामुळे मनसे अध्यक्ष राज ठाकरे भाजपसोबत जाणार का? अशी चर्चा सुरू झाली आहे.

# वाळूज एमआयडीसीत कामगाराचा अमानुष मारहाणीनंतर खून

■ महासागर प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर, दि. १२ :

शहरातील वाळूज एमआयडीसी परिसरात आज (12 जुलै) सकाळी एक धक्कादायक आणि मन हेलावणारी घटना समोर आली आहे. अंबेलोहळ (गट क्र. 37) येथे 23 वर्षीय अर्जुन रतन प्रधान या तरुण कामगाराचा अमानुष मारहाण करून खून करण्यात आला आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अर्जुन प्रधान हा वाळूज एमआयडीसीतील एका खासगी कंपनीत काम करत होता. कालच त्याचा पगार झाला होता. आज सकाळी अर्जुनचा सावत्र भाऊ रामकृष्ण याला तो रस्त्याच्या कडेला अर्धनग्न अवस्थेत, गंभीर जखमी अवस्थेत आढळून आला. तातडीने पोलिसांना कळवण्यात आले. वाळूज एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

मृतदेह पाहताच अर्जुनच्या आईने हंबरडा फोडला. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक तपासात, अर्जुनला कपडे काढून अमानुषपणे मारहाण करण्यात आली असून, यामधूनच त्याचा मृत्यू झाला असावा, असा संशय व्यक्त करण्यात आला आहे. मारहाण कोणत्या कारणातून आणि नेमकी कोणी केली? हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, अर्जुनचा कालच पगार झाल्याची माहिती आणि त्याच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी पोलिस करत आहेत.

# जनसुरक्षा नव्हे, भाजपचा दडपशाहीचा कायदा

## शोषितांचा आवाज दाबण्यासाठी प्रयत्न : संजय राऊतांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

जनसुरक्षा कायदा नसून भाजप सुरक्षा कायदा आहे. आम्ही त्याला विरोध करत राहू. दलित, शोषित पीडित यांचा आवाज उठवणाऱ्या संघटना, त्यांना समर्थन देणारे सामाजिक कार्यकर्ते त्यांना व्यसन घालून कारागृहात पाठवण्यासाठी हे जन सुरक्षा विधेयक आणले आहे, असे उबाठाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, जिथे फडणवीसांचे सरकार पोहचत नाही संघ पोहचत नाही तिथे संघटना पोहचतात ही यांची खरी पोटदुखी आहे. राज्यात जवळपास अशा 70 च्या आसपास संघटना कार्यरत आहे. त्यांच्यावर शहरी नक्षलवादी म्हणून कार्यवाही



करण्यासाठी हा कायदा आणला आहे, असा आरोप राऊतांनी केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, आणीबाणीच्या काळात मिसा कायदा आणला गेला होता. त्यामुळे आणीबाणी बदनाम झाली होती. मिसा कायद्याच्या अंतर्गत ज्यांना अटक करण्यात आली ते लोक गुन्हेगारी पार्श्वभूमीचे होते. त्यानंतर ताडा आला, त्यात छोट्या-छोट्या गुन्ह्यांमध्ये ताडा लावत राजकीय पदाधिकाऱ्यांचे खच्चीकरण करण्यात आले. आता जन सुरक्षा कायदा आणला. तुमचे सरकार आज आहे उद्या नाही. जनतेच्या सुरक्षेचा ठेका तुम्ही घेतलेला नाही. जन सुरक्षेमध्ये सामाजिक कार्यकर्त्यांवर अशा प्रकारे बंदी आणणे असा होत नाही. अनेक सामाजिक संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे.

संजय राऊत म्हणाले की, बहुमताच्या जोरावर तुम्ही कायदा मुजूर केला असला तरी विरोधी पक्षातील आम्ही सर्व या कायद्याला विरोध करु. उद्धव ठाकरे यांनी काल स्पष्ट केले आहे की हा जन सुरक्षा कायदा नसून भाजप सुरक्षा कायदा आहे. आजही आदिवासी पाड्यांवर रुग्णालय नाहीत. गरोदर महिलांना झोळीतून रुग्णालयात नेतांना त्यांचे मृत्यू झाले आहे. मुख्यमंत्र्यांच्या विदभार्तील आणि एकनाथ शिंदेंच्या ठाण्यातील चित्र अतिशय खराब आहे.

संजय राऊत म्हणाले की, माज्यावर कारवाई का करण्यात येईल? त्यांनी मला प्रबोधन केले तर चांगले होईल. आक्षेपार्ह व्हिडिओ समोर आला. मी तो प्रसिद्ध करण्यापूर्वी मीडियामध्ये आला. त्या व्हिडिओमध्ये राज्यातील मंत्री पैशाच्या बॅगेसह दिसून येत आहे. तुम्ही जन सुरक्षा कायदा आणला आहे ना, मी जनहितासाठी जर हा व्हिडिओ पुढे आणला असेल तर कुणाचा बेअब्रू होण्याचे कारण नाही. त्यांनी त्यावर खुलासा दिला आहे. व्हिडिओ मी काढला नाही, त्यांच्या घरातील हा व्हिडिओ आहे.

# आषाढीनिमित्त एसटीच्या ५,२०० जादा गाड्या

## तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भाविकांनी केला प्रवास

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरला जाण्यासाठी ठिकठिकाणांहून तब्बल ५,२०० जादा बसगाड्या सोडल्या. त्यामुळे एसटीला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपये उत्पन्न मिळाले. त्याचबरोबर या जादा बसगाड्यांमधून तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भाविक झ प्रवाशांना पंढरपुरला पोहोचणे सुकर झाले, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, आषाढी यात्रेनिमित्त महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या विठुरायाच्या दर्शनासाठी संपूर्ण राज्यातून पंढरपूर येथे मोठ्या संख्येने भाविक-प्रवाशी जातात. या भाविक-





प्रवाशांना त्यांच्या गावापासून पंढरपूरपर्यंत ने-आण करण्यासाठी एसटीने तब्बल ५ हजार २०० जादा बस सोडल्या होत्या. ३ ते १० जुलै दरम्यान या बसनी २१ हजार ४९९ फेऱ्या करून तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भाविक-प्रवाशांची सुरक्षित ने-आण केली. यातून एसटी महामंडळाला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपये इतके उत्पन्न मिळाले.

मागील वर्षी मिळालेल्या उत्पन्नापेक्षा ते ६ कोटी ९६ लाख ३ हजार रुपयांनी जास्त आहे. आषाढी यात्रेनिमित्त २०२४ मध्ये सोडलेल्या जादा बसगाड्यांमुळे एसटीला २८ कोटी ९१ लाख ५८ हजार रुपये उत्पन्न मिळाले होते. एसटीला आर्थिक फायदा करून देणारे, तसेच लाखो भाविकांना पंढरपुरला सुखरुप ने-आण करणारे हजारो चालक, वाहक, यांत्रिकी कर्मचारी व त्यांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक, अधिकारी अभिनंदन पात्र आहेत, असे प्रतिपादन सरनाईक यांनी केले. आषाढी यात्रेच्या काळामध्ये पंढरपूरमध्ये येणाऱ्या एसटी कर्मचारी व अधिकाऱ्यांची जेवणाअभावी गैरसोय होऊ नये, म्हणून प्रताप सरनाईक यांनी स्वखचार्तून ५, ६ व ७ जुलै रोजी मोफत जेवण, चहा-नाश्त्याची सोय केली होती. याचा फायदा हजारो एसटी कर्मचाऱ्यांनी घेतला. याबद्दल सर्व एसटी कर्मचाऱ्यांनी सरनाईक यांचे आभार मानले.

# परीक्षा घोळ टाळण्यासाठी सात सदस्यीय समिती स्थापन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

राज्याबाहेरील एमएचटी-सीईटी परीक्षा केंद्रांवरील गंभीर त्रुटींमुळे या केंद्रांना आता पूर्णतः बंद करण्यात येत असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत दिली. तसेच परीक्षेतील चुका टाळण्यासाठी कुलगुरू डॉ. सुनील भिरुड यांच्या अध्यक्षतेखाली सातसदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली आहे. या समितीचा कार्यभाग व्यापक असून प्रश्नसंच तयार करणाऱ्या तज्ज्ञांची निवड, प्रश्नसंचानुसार प्रश्नपत्रिका तयार करण्याची कार्यपद्धती निश्चित करणे यांचा त्यात समावेश आहे. परीक्षेतील तांत्रिक चुकांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊन फेरपरीक्षा घ्यावी लागल्याने ही समिती अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे, असे पाटील यांनी सांगितले.

सदस्य अभिजित वंजारी यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. मागील काही वर्षांत राज्यात पेपरफुटीची ८९ प्रकरणे घडली आहेत. सात सदस्यीय किंवा तत्समच्या परीक्षा टीसीएस आणि आयबीपीएस या कंपन्यातर्फे घेतल्या जातात. त्यात मोठ्या प्रमाणात घोळ होतो. यात टीसीएसचे कर्मचारी आणि केंद्रप्रमुखांचे साटेलोटे असते, असा आरोपही अभिजित वंजारी यांनी केला.

पाटणा येथील एका केंद्रावर ४ विद्यार्थ्यांना शंभर टक्के गुण मिळाले होते, जे अत्यंत संशयास्पद मानले गेले. यामुळेच महाराष्ट्राबाहेरील केंद्रांना आता संपूर्णतः बंद करण्यात येत असल्याचे मंत्री पाटील यांनी स्पष्ट केले. एमएचटी-सीईटीसह सर्व केंद्रपूर्व परीक्षा आणि स्पर्धा परीक्षा केवळ महाराष्ट्रातील पॉलिटेक्निक व इंजिनिअरिंग महाविद्यालयांमध्येच घेतल्या जाणार आहेत. खासगी संस्थांच्या केंद्रांवर गैरप्रकार आढळल्याने अशा संस्थांना काळ्या यादीत टाकण्याबाबतही सरकार सकारात्मक असल्याचे संकेतही दिले.

सुमारे ६.७७ लाख विद्यार्थ्यांनी दिलेल्या एमएचटी-सीईटी परीक्षेत मराठी व उर्दू भाषांमध्ये २१ त्रुटी आढळल्या होत्या. इंग्रजी प्रश्नपत्रिकेतदेखील २१ प्रकारच्या त्रुटी नोंदवण्यात आल्या. त्यामुळे ५ मे २०२५ रोजी काही विद्यार्थ्यांसाठी फेरपरीक्षा घेण्यात आली. या प्रकरणात जबाबदार तीन सदस्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून त्यांचा खुलासा असमाधानकारक ठरल्याने त्यांना गोपनीय परीक्षा कामावरून हटवण्यात आले आहे असे पाटील यांनी सांगितले.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन.** PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219